रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २६८
www.ramprahar.com

# राम प्रहर

मंगळवार, १६ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## ‘भाजपचे संकल्पपत्र म्हणजे देशाच्या समृद्धीची गॅरेंटी’



**नागपूर** : भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर केलेले संकल्पपत्र हा केवळ कागदी आश्वासनांचा पेटारा नसून जनतेच्या आशा आणि अपेक्षा पूर्ण करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदींची गॅरेंटी आहे. या संकल्पपत्रातील प्रत्येक संकल्प पूर्ण करण्यासाठी भाजप संपूर्ण ताकदीने अथक परिश्रम करणार असून समाजातील शेवटच्या स्तरावरील व्यक्तीपर्यंत विकासाची फळे पोहचविण्याचा पक्षाचा निर्धार आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १५) नागपूर येथे पत्रकार परिषदेत दिली. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व अन्य नेते यावेळी उपस्थित होते. महिला शक्ती, युवा शक्ती, शेतकरी आणि गरीब या समाजघटकांना अधिक सक्षम करून देशाला समृद्ध करण्याची मोदी यांची गॅरेंटी असून संपूर्ण जाहीरनामा रोजगारनिर्मितीला समर्पित आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे व्हिजन २०४७

### विकसित भारताच्या नियोजनाची मुलाखतीमधून माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०४७मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळून १०० वर्षे पूर्ण होतील. अशा वेळी देशात एक प्रेरणा जागृत होणे हेच प्रेरणादायी आहे. २०२४ हे एक महापर्व असून उत्सव म्हणून साजरे करायला हवे. माझे २०४७चे जे व्हिजन आहे, तो काही माझा वारसा नाही. त्यात १५-२० लाख लोकांच्या विचाराचा समावेश आहे. एक प्रकारे त्यावर देशाची मालकी आहे. मी केवळ ते कागदपत्राच्या स्वरूपात तयार केले आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत एएनआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत पीएम मोदींनी पुढील देशाचे २५ वर्षांचे नियोजन स्पष्ट केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी गेल्या दोन वर्षांपासून २०४७ला



डोक्यात ठेवून काम करतोय. त्यासाठी देशभरातील लोकांच्या सूचना मागवल्या. १५ लाखांहून अधिक लोकांनी याबाबत सूचना पाठवल्या आहेत. येणाऱ्या २५ वर्षांत भारत कसा पाहिजे यावर नागरिकांचे निवेदन घेतले आहे. विविध विद्यापीठ, संस्थांना एकत्रित केले. १५-२० लाख लोकांनी यावर अहवाल दिला. मग एआयच्या मदतीने त्याचे विभाजन केले.

विभाजनानंतर प्रत्येक विभागात अधिकाऱ्यांची टीम पुढील २५ वर्षांसाठी बनवली. अधिकाऱ्यांकडून या कामासाठी मी प्रेझेंटेशन घेतले. प्रत्येक विभागावर दोन-अडीच तास चर्चा केली. मला वाटते की, मी हे काही कागदपत्र बनवतो आहे हे व्हिजन मोदींची पोपटपंची नाही. १५-२० लाख लोक इन्पुट देत आहेत. म्हणजे संपूर्ण देशाचा यात समावेश आहे, असे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

निवडणूक झाल्यानंतर हा अहवाल राज्यांना पाठवला जाणार. मग राज्यात या संदर्भात चर्चा होईल. राज्यातून अहवाल आल्यानंतर यावर नीती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांबरोबर व्यापक चर्चा होऊन अंतिम निर्णय होईल, असे पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले.

मी तीन विभागात याचे नियोजन केले आहे. २५ वर्षांचे नियोजन, मग पाच वर्षांचे आणि पुढील शंभर दिवसांचे वेळापत्रक बनवून अधिकाऱ्यांना पाठवले आहे. २०१९मध्येही निवडणुकीत उतरण्याआधी मी अधिकाऱ्यांना १०० दिवसांसाठी कामाला लावले होते. निवडणूक संपल्यानंतर मी पुन्हा कार्यरत झाल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत कलम ३७० हटवले, मग तीन तलाक कायदा रद्द केला, बँकांचे एकत्रितकरण, प्राण्यांचे लसीकरण केले, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

### इलेक्टोरल बाँड्सवर विरोधकांना प्रत्युत्तर

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी निवडणूक रोख्यांवरून (इलेक्टोरल बाँड्स) केलेल्या आरोपाला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या वेळी प्रत्युत्तर दिले. इलेक्टोरल बाँड्सची योजना ही निवडणुकीतील काळ्या पैशाला आळा घालण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेमध्ये सुधारणेला वाव आहे. विरोधकांना मात्र केवळ आरोप करायचे आहेत. ते आरोप करतात आणि पळ काढतात, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, तपास यंत्रणांनी केलेल्या कारवाईनंतर देणगी देणाऱ्या १६ कंपन्यांपैकी ३७ टक्के रक्कम भाजपला आणि ६३ टक्के रक्कम भाजपला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांकडे गेली आहे.

## ठाकरे गटासह ‘मविआ’ला धक्का!

### सांगलीत काँग्रेसच्या विशाल पाटील यांच्याकडून अपक्ष अर्ज दाखल

**सांगली : प्रतिनिधी**

सांगली मतदारसंघात ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यातील वाद विकोपाला गेला असून विशाल पाटील यांनी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. सांगलीची जागा काँग्रेसला मिळावी यासाठी सातत्याने स्थानिक नेते आग्रह करीत होते, मात्र महाविकास आघाडीत ही जागा ठाकरे गटाला देण्यात आली असून या ठिकाणी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये प्रचंड नाराजी उफाळून आली आहे.



महाविकास आघाडी सांगलीबाबतचा निर्णय बदलेल अशी आशा स्थानिक नेत्यांना आहे. त्यासाठी नागपूर येथे काँग्रेस नेत्यांची बैठक होणार आहे, पण तत्पूर्वी विशाल पाटील यांनी सोमवारी (दि.१५) अपक्ष निवडणुकीचा अर्ज दाखल केला. ते मंगळवारी मेळावा घेऊन शक्तिप्रदर्शन करणार आहेत.

यानंतर विशाल पाटील आणखी एक अर्ज भरतील जो काँग्रेसकडून असेल. काँग्रेसकडून अधिकृत उमेदवारी मिळेल या आशेवरही नेते आहे. याबाबत विशाल पाटील यांनी सांगितले की, सांगली लोकसभा मतदारसंघातून उद्या उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे, तत्पूर्वी आज खरसुंडी येथे कुलदैवत सिद्धनाथाच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले. आपल्या सर्वांचे आशीर्वाद आणि सिद्धनाथाची कृपादृष्टी नेहमीच पाठीशी आहे. येणारा काळ कसोटीचा असला तरी सोबत संघर्षाचा वारसा आणि आपल्या सर्वांच्या प्रेमाचे पाठबळ ऊर्जा देणारे आहे. दरम्यान, यामुळे ठाकरे गटासह ‘मविआ’ची डोकेदुखी वाढली आहे.







पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शिवसेनेचे रामदास शेवाळे, परेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल विधानसभा मतदारसंघातील वावंजे पंचायत समिती, चिंध्रण पंचायत समितीनिहाय बैठका पार पडल्या. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, शिवसेनेचे रूपेश ठोंबरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी खासदार श्रीरंग बारणे यांना पुन्हा विजयी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना केल्या.

## निवडक

### अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

**नवी दिल्ली** : उत्पादन शुल्क धोरण घोटाळाप्रकरणी अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत २३ एप्रिलपर्यंत वाढ करण्यात आली आहे. १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी संपल्यानंतर सोमवारी (दि.१५) त्यांना तिहार तुरूंगातून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे राऊस व्हेन्यू कोर्टात हजर करण्यात आले. कोर्टाने पुन्हा त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे.

### मंत्री कपिल पाटील यांनी घेतली मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची भेट

**मुंबई** : केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार कपिल



पाटील यांनी सोमवारी (दि.१५) मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या मुंबईतील कृष्णकुंज निवासस्थानी भेट घेतली. या वेळी मंत्री पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्यासाठी महायुतीला पाठिंबा दिल्याबद्दल राज यांचे आभार मानले. या भेटीवेळी मनसेचे आमदार राजू पाटील, नेते अविनाश जाधव, अभिजीत पानसे, डी. के. म्हात्रे उपस्थित होते.





## अखिल भारतीय मराठा महासंघ आणि लहुजी शक्ती सेनेचा भाजप महायुतीला पाठिंबा

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या न्याय्य हक्कासाठी झगडणाऱ्या अखिल भारतीय मराठा महासंघाने आणि मातंग समाजाच्या मागण्यांसाठी लढणाऱ्या लहुजी शक्ती सेनेने लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष आणि महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. भाजप प्रदेश कार्यालयात पक्षाचे मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष दिलीप जगताप आणि लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी ही घोषणा केली.

या कार्यक्रमाला महायुतीचे समन्वयक आमदार प्रसाद लाड, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संतोष ननावटे, संभाजी दहातोंडे, राज्य संपर्कप्रमुख अनिल ताडगे, महेश सावंत, अविनाश राणे, परशुराम कासुळे; तर लहुजी शक्ती सेनेचे विष्णू कसबे, सचिन क्षीरसागर आदी उपस्थित होते. आमदार शेलार यांनी अखिल भारतीय मराठा महासंघ तसेच लहुजी शक्ति सेनेचे नेते आणि पदाधिकाऱ्यांचे पाठिंब्याबद्दल आभार मानले.

या वेळी आमदार शेलार म्हणाले की, मराठा समाज बांधवांची आरक्षणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार व महाराष्ट्रात महायुती सरकार कटीबद्ध आहे. आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी सविस्तर चर्चा याआधीच झाली असून पुन्हा या आठवड्यात चर्चा करून स्पष्टता आणू.

पंतप्रधान मोदींचा परिवार म्हणजे वंचितांचा, गरीबांचा परिवार आहे. या परिवारात सहभागी झालेल्या प्रत्येक घटकाच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी भाजप अविरत झटत आहे. मातंग समाजाच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम करणारी लहुजी शक्ती सेना महायुतीमध्ये सहभागी झाल्याने आमचे हात अधिक मजबूत झाले आहेत. या समाजाच्या कल्याणासाठी भाजप वचनबद्ध आहे, असेही आमदार शेलार म्हणाले.

## बेलपाडा येथील अनधिकृत झोपड्यांवर पनवेल महानगरपालिकेची कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील बेलपाडा गावाच्या मागे डोंगरावर अचानक अनधिकृतपणे उभ्या राहिलेल्या ७५ झोपड्यांवर कारवाई करून त्या जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. पनवेल महापालिकेने ही कारवाई करीत नागरिकांना मोठा दिलासा आहे.

बेलपाडा गावाजवळ डोंगर परिसरात अनधिकृतरित्या झोपड्या बांधल्या जात असल्याची तक्रार भाजपचे खारघर शहर अध्यक्ष व माजी नगरसेवक प्रवीण पाटील, ॲड. अमर उपाध्याय, कीर्ती नवघरे यांनी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे केली होती. बेलपाडा गावाच्या मागे आणि डोंगराळ भागात उभ्या राहिलेल्या या झोपड्या सहजा नजरेत येत नाहीत, मात्र या भूखंडावर अनधिकृतपणे झोपड्यांचे बस्तान बांधल्याने नागरिकांना त्याचा नाहक त्रास होत होता. अशा प्रकारच्या झोपड्यांना आंदण मिळू नये आणि अशा प्रकारामुळे झोपड्यांचे प्रमाण वाढू नये यासाठी अनधिकृत झोपड्यांवर वेळेवर कारवाईची गरज लक्षात घेता माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महापालिकेचे प्रभारी आयुक्त प्रशांत रसाळ आणि प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांच्याकडे या संदर्भात तक्रार करून कारवाईची मागणी केली होती. (पान २ वर..)



## यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार

**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने यंदाच्या मान्सूनचा पहिलावहिला अंदाज वर्तवत बळीराजासह सर्वांनाच मोठा दिलासा दिला आहे. ला निनो मान्सूनमध्ये सक्रिय होईल आणि त्यामुळे देशाच्या ८० टक्के भागांत १०६ टक्के पाऊस पडेल. देशासाठी ही अतिशय आनंदवार्ता आहे, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्यूंजय महोपात्रा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

काही दिवसांपूर्वीच स्कायमेट या खासगी हवामान संस्थेने या वर्षी १०२ टक्के पाऊस पडण्याची



शक्यता व्यक्त केली होती. त्यानंतर सोमवारी (दि.१५) हवामान विभागाचे यंदाच्या मान्सूनचा पहिला अंदाज जाहीर केला. महासंचालक महोपात्रा म्हणाले की, या वर्षी १०६ टक्के पावसाचा अंदाज आहे. गेल्या वर्षी आम्ही ९६ टक्के पावसाचा अंदाज दिला होता आणि ९४

### भारतीय हवामान विभागाचा अंदाज

टक्के पावसाची नोंद झाली. आता यंदा मान्सूनमधील प्रत्येक महिनावार पावसाचा अंदाज आम्ही मे अखेरच्या बुलेटिनमध्ये देऊ. मान्सूनच्या पहिल्या टप्प्यात खूप पाऊस होणार नाही, परंतु दुसऱ्या टप्प्यात अधिक पाऊस होण्याचा अंदाज आहे.

मान्सूनपूर्व पाऊस हा निवडणुकीवर काही परिणाम करू शकतो का? याविषयी महोपात्रा म्हणाले, या काळात कोणतेही वादळ येण्याची शक्यता नाही, पण उष्णतेची लाट येऊ शकते, तर काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस होईल. उष्णतेच्या लाटेविषयी शासनाला कल्पना दिलेली आहे. आम्ही निवडणूक काळात सातत्याने निवडणूक आयोगाला अपडेट देत राहणार आहोत.

देशातील ८० भागांमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. जम्मू काश्मिर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, आसाम, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, ओरिसा, छत्तीसगड, झारखंड, प. बंगाल या राज्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस होईल. इतर सर्व राज्यांमध्ये सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आहे, असे महोपात्रा यांनी सांगितले.



लोणावळा : आगरी-कोळी समाजाचे कुलदैवत असणाऱ्या एकविरा देवीच्या पालखी सोहळ्यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सपत्नीक कार्ला गडावर जाऊन देवीचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, कोळी समाजाचे विश्वनाथ कोळी तसेच अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर आदी उपस्थित होते.

# शेकापकडून विकासाला नेहमीच विरोध

## चौल–नागावमध्ये महायुतीची आढावा सभा

### आमदार महेंद्र दळवी यांचा हल्लाबोल



**रेवदंडा : प्रतिनिधी**

संविधान वाचवा, या आमदार जयंत पाटीलाच्या दिशाभुल प्रचाराचा खरपुस समाचार माजी जि.प. सदस्य बाळाशेठ तेलंगे व आम. महेंद्र दळवी यांनी चौल–नागाव जिल्हा परिषद विभागीय महायुतीची आढावा सभा चौल येथील पाठारे क्षत्रिय समाज सभागृहात झालेल्या सभेत घेतला. या सभेत शेकापवर चौफेर टोलेबाजी करून टिकेचा हल्लाबोल उपस्थितांना संबोधीताना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

या सभेत विभागाची धडाडीची तोफ म्हणून ओळख असलेले बाळाशेठ तेलंगे यांनी म्हटले की, शेकापचे आमदार जयंत पाटील प्रत्येक सभेत संविधान वाचविण्यासाठी देशात बदल गरजेचे असल्याचे दिशाभूल करत आहेत, कोणीही संविधान बदल करावयास निघालेले नाही तर आवश्यक तेथे कायद्यात बदल केला जातोय असा उपस्थितांना खुलासा केला, तर यापुर्वीचा शेकाप हा कामगाराचा शेकाप होता, शेतकरी व कष्टकरांचा पक्ष म्हणून ओळखला जात असे, शेकाप विविध आंदोलने केली जात होती, परंतु सध्याचा शेकाप कामगार व कष्टकराचा शेकाप राहिला नसून तो भांडवळदारांचा पक्ष झाला असल्याचा आरोप बाळाशेठ तेलंगे यांनी संवाद साधताना म्हटले.

या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी सुध्दा शेकापवर चौफेर टोलेबाजी करून हल्लाबोल केला, बाळाशेठ तेलंगे यांनी केलेली टिका योग्य असल्याचे म्हटले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ऋषीकांत भगत यांनी आमदार महेंद्र दळवी यांनी गेल्या पाच वर्षात १५०० कोटीची विकास कामे मतदार संघामध्ये केली असल्याचे सांगितले, आतापर्यंत एव्हढी विकास कामे झाली नसल्याचे सांगून शेकापने येथील विकासाला नेहमीच विरोध केला असल्याचा आरोप केला. या वेळी त्यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने नागाव–चौलमध्ये पाणीपुरवठा योजनेमार्फत मोठा निधी उपलब्ध केला असून चौल व नागावकरांचा पाणी प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असे सांगितले.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी महाआघाडीचे उमेदवार अनंत गिते यांचेवर टिकास्त्र सोडले, गेल्या पाच वर्षात कोरोना कालावधी, निसर्गचक्री वादळ, महापुर आदी काळात महाआघाडीचे उमेदवार अनंत गिते कुठे होते हा प्रश्न मतदारांनी त्यांना करावे, असे आवाहन केले. तसेच प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव असलेले महायुतीचे खासदार सुनील तटकरे यांनी भरघोस मताने निवडून दया, असे आवाहन केले. या सभेत शिवसेना तालुका प्रमुख अनंता गोंधळी, भाजप माजी तालुका अध्यक्ष हेमंत दांडेकर, दिपश्री पाटील आदीने उपस्थितांना महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ भाषण केले.

चौल–नागाव विभागीय महायुतीच्या सभेचे अध्यक्षस्थान आमदार महेंद्र दळवी यांनी भुषविले होते तर ॲड. महेश मोहिते, संतोष पोटपोडे, दीपक रानवडे, आशिष भट, ऋषीकांत भगत, बाळाशेठ तेलंगे, प्रफुल्ल मोरे, प्रविण राउत, जयेंद्र भगत, हेमंत दांडेकर, अनंता गोंधळी, संजिवनी नाईक, दिपश्री पाटील, उदय काठे, सतिश लेले, प्रतिक्षा राउत, माणिक बळी, मंदाताई बळी, ताराचंद कोंडे, हर्षल घरत, प्रशांत शेणवईकर, आदी महायुतीचे प्रमुख पदाधिकारी व्यासपिठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भाजपचे विश्वास जोशी यांनी केले.

## ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका अश्विनी मते यांचा भाजपमध्ये प्रवेश



**मुंबई : प्रतिनिधी**

उबाठा गटाच्या माजी नगरसेविका अश्विनी मते यांनी सोमवारी आपल्या शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या प्रवेश कार्यक्रमाला मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार आशिष शेलार, प्रदेश भाजपाचे कोषाध्यक्ष व ईशान्य मुंबई मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार मिहीर कोटेचा, आमदार राम कदम, खासदार मनोज कोटक, अमरजीत मिश्रा, प्रभाकर शिंदे, पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य आशा बुचके, भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी अश्विनी मते व त्यांच्या समर्थकांचे भाजपमध्ये स्वागत केले. या वेळी प्रदेश भाजपाचे कोषाध्यक्ष व ईशान्य मुंबई मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार मिहीर कोटेचा म्हणाले की, अश्विनीताई या सामान्य माणसाची कामे मार्गी लावण्यासाठी धडपड करणाऱ्या लोकप्रतिनिधी आहेत. नरेंद्र मोदी यांच्या गरीब कल्याणाच्या कार्यक्रमाला साथ देण्यासाठी अश्विनी मते यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. अश्विनी मते यांच्या भाजपा प्रवेशामुळे मिहीर कोटेचा यांचे मताधिक्य आणखी वाढणार आहे, असे ईशान्य मुंबई मतदारसंघाचे विद्यमान खासदार मनोज कोटक यांनी सांगितले.

उबाठा गटात काम करताना आपल्याला विकास कामे करताना त्रास होत होता म्हणून आपण भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला, असे अश्विनी मते यांनी सांगितले. अश्विनी मते यांच्यासमवेत उबाठा गटाच्या विनायक कोरडे, बाळू सोमटोपे, मलंग शेख, सुरेश मोरे, अर्जुन चौरसिया, महावीर नाईक, महेंद्र सोनावणे या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

## निवडक

### रामदास डोके यांचे अभीष्टचिंतन



**नवी मुंबई :** श्रमिक रामदास को ऑप सोसायटी संस्थेचे कणखर खंबीर नेतृत्व संस्थापक अध्यक्ष रामदास डोके यांच्या ७४व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन वाशी येथे करण्यात आले होते. या वेळी संस्थेच्या अध्यक्षा शारदा डोके, माजी नगरसेवक राजू शिंदे, उपाध्यक्ष के आर चौधरी, सचिव शंकर पाटील, सह खजिनदार डॉ. भीमराव लंगे, संचालक स्वप्निल गवळी, शिल्पा चौधरी, खजिनदार शरद कडुसकर, श्रीराम डोके, अलका वाघमारे, तानाजी शिंदे, राजेंद्र कर्णे, विशेष वसुली अधिकारी रामचंद्र विठ्ठल वाघमारे, शाखा व्यवस्थापक महेश अर्जुन डोके, सरला चौधरी, गुलाबराव लोखंडे, प्रल्हाद सोनवणे तसेच रामदास श्रमिक संस्थेचे सभासद आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कच्छ युवक संघातर्फे रक्तदान शिबिर



**पनवेल :** शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटी येथील गणपती मंदिर येथे कच्छ युवक संघ पनवेल शाखा तसेच पनवेल सराफ अँड ज्वेलर्स असोसिएशन यांच्या माध्यमातून अँकरवाला रक्तदान अभियान राबवण्यात आले होते. या वेळी मोठ्या प्रमाणात तरुणवर्ग सहभागी झाला होता. कच्छ युवक संघाचे हे ८५वा मेगा ब्लड डोनेशन कॅम्प होता. या कॅम्पला उद्योजक संजय जैन यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लाभली, अशी माहिती बिपीन शहा यांनी दिली.



**पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती करंजाडे येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी सदस्य, धम्म बांधव–भगिनी, युवक–युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## लोकसभा निवडणुकीत महायुतीचे प्रामाणिकपणे काम करा –सुधाकर घारे

**कर्जत : प्रतिनिधी**

आपल्या पक्षात दर आठवड्याला अनेक पक्षातून कार्यकर्ते प्रवेश करतात. त्यांचा योग्य मान सन्मान ठेवा. आता लोकसभेची निवडणूक आहे. त्यामुळे या निवडणुकीत सर्वांनी महायुतीचे काम प्रामाणिकपणे करावे, असे स्पष्ट प्रतिपादन रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी येथे केले.




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जन संपर्क कार्यालयात पक्ष प्रवेश व नियुक्तीपत्र देण्याच्या समारंभाचे आयोजन केले होते. या वेळी व्यासपीठावर सुधाकर घारे, प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, प्रदेश प्रतिनिधी भगवान भोईर, तालुका अध्यक्ष भगवान चंचे, महिला तालुका अध्यक्ष रंजना धुळे, युवक अध्यक्ष स्वप्नील पालकर, शहर कार्याध्यक्ष राजाभाऊ कोठारी, अल्पसंख्यांक सेल तालुका अध्यक्ष सरफराज टीवळे, तालुका युवती अध्यक्ष सुचिता लोहकरे, नारायण कारोटे, जनार्दन ऐनकर, अनिस मणियार आदी उपस्थित होते.

या वेळी बेकरे वाडी येथील ग्रामस्थ आणि महिलांनी पक्षात प्रवेश केला. तसेच भिसेगाव येथील मनीषा ठोंबरे यांची कर्जत शहर महिला कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. सुत्रसंचलन ॲड. स्वप्नील पालकर यांनी केले.

## पोलीस असल्याचे सांगून फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून एका ज्येष्ठ नागरिकासह महिलेजवळचे सुमारे एक लाख ६० हजार रुपये किमतीचे दागिने लुबाडून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या तोतया पोलिसांविरोधात खांदेश्वर तसेच एनआरआय पोलिसांनी फसवणुकीचे गुन्हे दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

नवीन पनवेल सेक्टर १०मध्ये राहणारे दिनेश कांबळे (वय ६४) हे आदई सर्कल येथील मार्केटमधून आपल्या घरी पायी चालत जात होते. या वेळी पोलीस असल्याची बतावणी करून दोघा भामट्यांनी कांबळे यांना सोने घालून फिरू नका, असे बजावून त्यांना अंगावरील दागिने काढून ठेवण्यास भाग पाडले. त्यामुळे कांबळे यांनी घाबरून सोन्याची चेन व अंगठी काढली असता, सदर भामट्यांनी त्यांचे दागिने कागदामध्ये व्यवस्थित ठेवण्याच्या बहाण्याने आपल्याकडे घेऊन त्यातील ६० हजार रुपये किमतीचे दागिने चोरले. त्यानंतर रिकामा कागद त्यांना देऊन त्या ठिकाणावरून पलायन केले.

काही वेळानंतर कांबळे यांनी कागद उघडून पाहिल्यानंतर त्यात दागिने नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. दुसऱ्या घटनेत उलवेमध्ये राहणाऱ्या मेघा भोसले (वय ५९) या आपल्या नातवाला शाळेमध्ये सोडून घरी जात होत्या. या वेळी सेक्टर १९ मधील सत्यम टॉवर इमारतीजवळ दोघा भामट्यांनी पोलीस असल्याची बतावणी करून पुढे चोरीच्या घटना घडल्याचे सांगून त्यांना घाबरवले. त्यानंतर त्यांना अंगावरील दागिने काढून ठेवण्यास भाग पाडले. त्यामुळे मेघा भोसले यांनी आपल्या गळ्यातील एक लाख रुपये किमतीची सोन्याची चेन व माळ काढली असता, या भामट्यांनी त्यांचे दागिने कागदामध्ये व्यवस्थित ठेवण्याचा बहाणा केला. त्यानंतर भामट्यांनी त्यांचे दागिने चोरुन रिकामा कागद त्यांच्याकडे देऊन पलायन केले.

काही वेळानंतर मेघा भोसले यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी एनआरआय पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पान १ वरून

### बेलपाडा येथील अनधिकृत झोपड्यांवर पनवेल महापालिकेची कारवाई

या मागणीनुसार सोमवारी (दि.१५) सकाळी प्रभारी आयुक्त प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त मारुती गायकवाड, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, अतिक्रमणविरोधी विभागाचे प्रमुख रत्नाकर जाधव, स्वच्छता निरीक्षक संदीप भोईर, अतुल मोहोकर आणि ५० कर्मचारी यांनी त्या ठिकाणी तीन जेसीबींच्या सहाय्याने अनधिकृत झोपड्या जमीनदोस्त करीत ती जागा पूर्ववत करून नागरिकांना दिलासा दिला आहे.

या कारवाईबद्दल माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी समाधान व्यक्त करून प्रभारी आयुक्त प्रशांत रसाळ आणि प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांचे दूरध्वनीवरून आभार मानले आहेत. दरम्यान, या कारवाईमुळे अनधिकृतपणे झोपड्यांचा विळखा उभारणाऱ्यांना जरब बसली आहे.

## चिरनेरकरांचे पुराचे संकट टळणार

### साकव, मोऱ्यांच्या कामाला प्रारंभ

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर गावाला दरवर्षी पावसाळ्यात पूरसदृश्य परिस्थितीचा सामना करावा लागतो. याचे गांभीर्य लक्षात घेत चिरनेर हायस्कूल ते मोठेभोम दरम्यान एक छोटा पूल आणि साडेपाच फुटी उंचीच्या तीन पाईपांच्या मोऱ्या बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग उरण यांनी पावसाळा युद्धपातळीवर सुरू केले आहे.




चिरनेरमध्ये उद्भवणारी पूर सदृश्य परिस्थिती आणि त्यातील असुरक्षितता हा मुद्दा अधोरेखित झाला होता, मात्र या पूर सदृश्य परिस्थितीची सोडवणूक करण्यासाठी उरण तालुका दैनिक पत्रकार संघाने पुढाकार घेऊन संघाचे अध्यक्ष जीवन केणी व सचिव दत्तात्रेय म्हात्रे व सहकाऱ्यांनी १९ जुलै २०२३च्या पुरानंतर २७ जुलै २०२३ रोजी उरणचे तहसीलदार, पनवेल येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यकारी अभियंत्या व उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे या चिरनेर गावाच्या पूर सदृश्य परिस्थितीतुन वाचविण्यासाठी पाण्याचे मार्ग सुरळीत होण्यासाठी चिरनेर हायवेलगत बेकायदेशीर करण्यात आलेली अतिक्रमणे हटवून पाण्याचा निचारा योग्य रीतीने होण्यासाठी उपाय योजना करणेबाबत मागणी करण्यात आली होती.

याचप्रमाणे उरणचे तहसीलदार उद्धव कदम आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यकारी अभियंत्या रुपाली पाटील व उरण सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपविभागीय अधिकारी नरेश पवार यांच्याकडे वेळोवेळी करण्यात आलेल्या पाठपुराव्यानंतर २२ ऑक्टोबर २०२३ चिरनेर हायवे येथे एक पूल आणि चार पाईपांच्या मोऱ्या यासाठी एक कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आत्ता प्रत्यक्षात वरील नमूद मंजूर कामातील पाईपांच्या मोऱ्यांच्या कामाला प्रारंभ झाला आहे. यामध्ये चिरनेर हायस्कूल ते मोठेभोम दरम्यान एक छोटा पूल आणि साडेपाच फुटी उंचीच्या तीन पाईपांच्या मोऱ्या बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग उरण यांनी पावसाळा दोन महिन्यांवर आल्याने ठेकेदारा मार्फत युद्धपातळीवर सुरू केले आहे. त्यामुळे दरवर्षी पुराच्या पाण्याच्या संकटाशी सामना करणाऱ्या चिरनेर वासियांची पुराच्या पाण्यातून सुटका होईल, अशी अपेक्षा येथील ग्रामस्थ करीत आहेत. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी उरण तालूका दैनिक पत्रकार संघाने दिलेले निवेदन आणि वेळोवेळी करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश आले असून हे काम प्रत्यक्षात आले आहे.

चिरनेर येथील या पाण्याचा निचारा होण्यासाठी, ग्रामस्थांना पुराच्या संकटातून वाचविण्यासाठी चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच भास्कर मोकल यांनीही सदरचे काम पूर्ण करून घेण्यासाठी स्वतः कामाच्या ठिकाणी जातीने लक्ष घालून सदरचे काम पूर्णतःवास नेण्यासाठी अधिक वेळ दिल्याने चिरनेर ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

> **चिरनेर हायवे येथील पाण्याचा निचरा होण्यासाठी चिरनेर हायस्कूल ऐवजी मधल्या ठिकाणी एक स्लॅब ड्रेन व पुढे तीन साडेपाच फुटी उंचीच्या काँक्रिटपाईपांच्या मोऱ्या बांधण्याचे कामाला दोन दिवसांपासून सुरुवात करण्यात आली आहे. पावसाळ्याआधी ही कामे पूर्ण होण्याच्या मार्गांवर आहेत.**
>
> **–नरेश पवार, उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उरण**

## लोकशाही बळकट होण्यासाठी पुस्तकांची कास धरावी –सोनावणे


**नवी मुंबई : प्रतिनिधी**

लोकशाही बळकट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी पुस्तकांची कास धरावी, असा सल्ला भाजपचे माजी महापौर सुधाकर सोनावणे यांनी ऐरोली येथे बोलताना दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी डॉ आंबेडकर स्मारकाला माजी महापौर सोनावणे यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला उत्सवाचे स्वरुप आले आहे. डॉ आंबेडकर यांच्या अनुयायींनी पुस्तकाची कास धरावी. डॉ बाबासाहेब यांनी मला पुतळ्यात नको तर पुस्तकात शोधा असे सांगितले होते. त्यांच्या संकल्पनेतून आम्ही पुतळा विरहित स्मारक निर्माण केले. या ठिकाणी सुमारे पाच हजार ३०० पुस्तके संग्रहित आहेत. देशातील लोकशाही धोक्यात येत असून विषमता वादावर विजय मिळवायचा असेल तर पुस्तकप्रेमीची संख्या वाढली, असे त्यांनी बोलताना सांगितले.

## किरीट सोमय्या यांना मातृशोक

**मुंबई : रामप्रहर वृत्त**



भाजप ईशान्य मुंबईचे माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांच्या मातोश्री गुणवंतीबेन जयंतीलाल सोमैया यांचे सोमवारी (दि. १५) निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी रात्री १०.३० वाजता मुलुंड येथील घरातून निघाली आणि डम्पिंग रोड स्मशानभूमीमध्ये गुणवंतीबेन यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पनवेलमध्ये भीम जयंतीचा उत्साह

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने पुढच्या पिढीला चांगले शिक्षण द्यावे

■ **आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन**







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन आपण सर्वांनी आपल्या पुढच्या पिढीला चांगले शिक्षण द्यावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी ख्यातनाम गायक आनंद शिंदे यांच्या भिमगीतांच्या कार्यक्रमावेळी केले. तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत सर्वांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेकडर यांची १३३ वी जयंती सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपुर्ण वातावरणात रविवारी साजरी झाली. जयंतीनिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याअंतर्गत दरवर्षी प्रमाणे नवीन पनवेल सार्वजनिक जयंत्ती महोत्सव समितीच्या वतीने आपल्या भारदस्त आवाजाने अख्ख्या महाराष्ट्राला थिरकायला लावणारे गायक आनंद शिंदे याच्या भिमगितांच्या कार्यक्रमाचे आयोजन नवीन पनवेल सेक्टर ३ येथील जय अंबे माता मैदानात माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी केले होते.

या कार्यक्रमाला भाजपचे मावळ लोकसभ निवडणुक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉक्टर कविता चौतमोल, माजी नगरसेविका दर्शना भोईर, ॲडव्होकेट वृषाली वाघमारे, सुशीला घरत, माजी नगसरेवक ॲडव्होकेट मनोज भुजबळ, अजय बहिरा, शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, तालुका प्रमुख रुपेश ठोंबरे, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, प्रतिभा भोईर, सपना पाटील, लीना पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, सार्वजनिक जयंत्ती महोत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि भिमअनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती तथागत मित्र मंडळ भगत चाळ लोकमान्य नगर रेल्वे स्टेशन रोड पनवेल येथे मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, जगदीश घरत, शक्ती केंद्र प्रमुख राजू बगाटे, युवा कार्यकर्ते प्रितम म्हात्रे, युवा नेते प्रतिक बहिरा, कार्यकर्ते राकेश भुजबळ, अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, कार्यकर्ते आप्पा लोखंडे, सर्जे राव साळवे,किरण वाहुळकर, विजय झिरे, गणेश जाधव, राजू झिरे, उमेश कांबळे, गोपाल पट्ठे, योगेश खरात, हरिभाऊ घुले,सागर जाधव, अजय सकपाळे, अनिल सुरवाडे तसेच तथागत मित्र मंडळाचे कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी रावसाहेब खरात यांच्या प्रयत्नाने वसाहतीतील १८ वर्षा वरील ६५ ते ७० मुले मुलींची नवीन मतदार नोंदणी करून त्यांचे मतदार कार्ड माजी नगरसेवक भुजबळ आणि जयंत पगडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.







## मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी

### 'आशा'च्या माध्यमातून महिला बैठक




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी सोमवारी (दि. १५) टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये प्रभात फेरी घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या मतदान जनजागृतीपर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच आशा सेविकांनी ३३ मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये विविध ठिकाणी महिलांच्या बैठका घेऊन मतदान जनजागृती केली.

स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम)अमंलबजावणी ३३ मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघांतील महापालिका कार्यक्षेत्र तसेच पनवेल ग्रामीण भागात केली जात आहे. आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ व स्वीप पथक प्रमुख अधिकारी मुख्य अभियंता संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत.

गेल्या काही दिवसापासून महापालिकेच्या वतीने व तहसील कार्यालयाच्या वतीने विविध शाळांच्या माध्यमातून प्रभातफेरीच्या माध्यमातून मतदान मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल विधानसभा मतदारसंघांतर्गत मतदान जनजागृती केली जात आहे. आज टिळक महाराष्ट्र विद्यापीठमध्ये प्रभात फेरी घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या मतदान जनजागृतीपर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'आशा' सेविकांनी शिवाजी नगर, पेंधर, खारघर, सेक्टर १६ कामोठे, धाकटा खांदा अशा विविध याठिकाणी महिलांच्या बैठका घेऊन त्यांना मतदानाचे महत्त्व पटवून सांगितले. याचबरोबर ८५ वर्षांवरील नागरिक व दिव्यांग यांना एकत्रित करून त्यांच्यामध्ये मतदान जनजागृती करण्यात आली.



# खारघरच्या कोपरा नाल्यावर साकारतोय नवीन पूल

**खारघर : प्रतिनिधी**

खारघरच्या दोन प्रवेशद्वारांपैकी एक असलेल्या कोपरा पुलावर होणारी वाहतुक कोंडी तसेच जीर्ण झालेला जुन्या पुलाला पर्याय म्हणुन सिडकोच्या माध्यमातून कोपरा नाल्यावर आणखी एक नवा पूल उभारणार आहे. सात मीटरचा अरुंद पूल पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचा सिडकोचा मानस आहे.

खारघर शहरात कोपरा पूल हे वाहतूक कोंडीचे मुख्य केंद्र बनत चालले आहे. सकाळ संध्याकाळी होणारी वाहतूक कोंडी हि याठिकाणची मुख्य समस्या बनली आहे. विशेष म्हणजे जीर्ण झालेल्या जुन्या पूलदेखील धोकादायक बनत चालला असल्याने सिडको याच पुलाच्या बाजुला नवा पूल उभारत आहे. महाराष्ट्र भूषण कार्यक्रमाच्या अनुषंगाने उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या पुलाच्या जागी हा पूल उभारला जात आहे. या पुलाच्या कामालादेखील



सुरुवात करण्यात आली आहे. हा पूल कार्यान्वित झाल्यास जुन्या पुलाला वळसा न घालता थेट सायन पनवेल महामार्गावर प्रवेश करता येणार आहे. याकरिता सुमारे एक ते दीड कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. याकरिता कोपरा नाल्यात पिल्लर उभारण्यात येणार आहे. पुलावर कॉक्रिटचा रस्ता तयार करण्यात येणार असल्याची माहिती सिडकोचे खारघर मधील अभियंता अमित औटी यांनी दिली. सध्या जीर्ण झालेला कोपरा पूल या पर्यायी पुलाचे काम पूर्ण झाल्यावर केवळ पादचाऱ्यांसाठी आरक्षित करण्यात येणार आहे.

कोपरा पुलावर मोठा कायमस्वरूपी पूल नियोजित आहे. नवी मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीच्या अडथळ्यामुळे याठिकाणचा मोठ्या पुलाचे काम रखडले आहे, मात्र तत्पूर्वी या मार्गावर वाढत चाललेली कोंडी पाहता सिडकोने या पुलाच्या रूपाने तात्पुरता पर्याय काढला आहे, मात्र मुंबईकडे जाण्यासाठी कोपरा पूल हा एकमेव पर्याय असल्याने वाहनचालकांना नाईलाजास्तव विरुद्ध दिशेने वाहन चालवावी लागत आहेत. त्यामुळे मुंबईकडे जाण्यासाठीदेखील पर्यायी मार्ग सिडकोने तयार करण्याची गरज आहे.

**कोपरा नाल्यावर पूल हा तात्पुरत्या स्वरूपाचा पूल असणार आहे. याठिकाणी होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी सिडको नवा पूल उभारत आहे. याकरिता दिवाळीपर्यंत काम पूर्ण करण्याची मुदत असली तरी पावसाळ्यापूर्वी या पुलाचे काम मार्गी लागावे असा आमचा मानस आहे.**

**–अमित औटी, अभियंता, सिडको खारघर विभाग**

### मुंबईला जाण्यासाठीही पर्यायी मार्गाची मागणी

**सिडको हा नवीन पूल उभारत आहे ही चांगली गोष्ट आहे, मात्र मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांसाठीदेखील पर्यायी व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यानंतर कोपरा पुलावरील वाहतूक कोंडी सुटेल, अशी प्रतिक्रिया खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष काणे यांनी दिली.**



**पनवेल : तालुक्यातील कोंडले येथे १४ ते १७ ते एप्रिलदरम्यान श्रीराम मंदिर उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील तसेच रवींद्र पाटील, गणेश शिंदे, हरिश्चंद्र खंडागळे, सुरेश शेट्ये, गणेश कोंलबेकर, श्रीराम बडेकर, जनार्दन कोळंबेकर, रामदास शिंदे, रामदास कातकरी आदी उपस्थित होते.**



**पनवेल : आई एकविरा देवीच्या पालखी सोहळ्यानिमित्त गव्हाणमध्ये आई एकविरा नवरात्र उत्सव सेवा मंडळाच्या वतीने पालखीचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. या सोहळ्याला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी कोळी समाजाचे विश्वानाथ कोळी, जयवंत कोळी, अमित कोळी, हडकू कोळी आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)



**पनवेल : कोन गावातील सुपुत्र प्रबोध नंदकिशोर म्हात्रे केंद्र शासनाच्या अग्निपथ योजनेमध्ये सैन्य भरती झाल्याने ग्रामस्थांच्या वतीने त्याचा अग्निवीर म्हणून सन्मान करण्यात आला. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही प्रबोधचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी सरपंच विठ्ठल गाताडे, दीपक म्हात्रे, निलेश म्हात्रे, ॲड. दत्तात्रेय घरत, संतोष गाताडे, काशिनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)





**पनवेल : केळवणे येथे बहिरीदेवी उत्सव पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. आमदार महेश बालदी यांनी तेथे भेट दिली व देवीचे दर्शन घेतले. या वेळी केळवणे विभागीय युवा मोर्चा अध्यक्ष सुशील ठाकूर, माजी उपसरपंच भानूदास गावंड, नंदकुमार गावंड, सतिश घरत, राजेश घरत, सुरेश शिवकर, हरिश्चंद्र माळी, संजय पाटील, कृष्णा म्हात्रे, रमेश ठाकूर, जगन्नाथ म्हात्रे, कमलाकर शिवकर, भारत ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य ओमकार गावंड, तेजस माळी, पांडुरंग म्हात्रे आदी उपस्थित होते.**



**खारघर : सेक्टर २०मध्ये येथे एमबीबीएस, डीडीव्ही सल्लागार क्लिनिकल आणि कॉस्मेटिक त्वचा शास्त्रज्ञ आणि ट्रायकोलॉजिस्ट डॉ. ट्विंकल दडगा यांनी वन स्किन क्लिनिक सुरू केले आहे. या क्लिनिकचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, किरण पाटील, कांतीभाई पटेल, नितेश पाटील, प्रवीण बेवा, सुरेश नकरानी, उर्मिला दडगा, विवेक दडगा, भाव्या नकरानी, तृप्ती नकरानी आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# विकासाची त्रिसूत्री

विकास, विरासत आणि गरीब कल्याण या तीन पायऱ्या ओलांडून आपला देश उज्ज्वल भवितव्याकडे पावले टाकू लागेल तो दिवस आता दूर नाही. भारतीय जनता पक्षाने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी संकल्पपत्र सादर केले. विशेष म्हणजे या संकल्पपत्राच्या प्रकाशनासाठी डॉ. आंबेडकर जयंतीच्या पवित्र दिनाची निवड केली गेली हा काही योगायोग नव्हे. या जाहीरनाम्याचे नाव 'भाजप का संकल्प, मोदी की गॅरंटी' असे सार्थ ठेवण्यात आले आहे.

सुमारे दहा वर्षांपूर्वी म्हणजेच २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे दमदार सरकार सत्तेवर आले, तेव्हाच भारताच्या इतिहासाला एक सकारात्मक कलाटणी मिळाली होती. भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये तीन प्रमुख मुद्दे ठळकपणाने नमूद केलेले असायचे. काँग्रेसजन या तिन्ही मुद्यांची यथेच्छ टिंगल करण्यात धन्यता मानत असत. जम्मू-काश्मीरमधील ३७० कलम हटवणे, अयोध्येत राम मंदिराची उभारणी आणि देशभर समान नागरी कायद्याची अंमलबजावणी हे ते तीन मुद्दे. कलम ३७० हटवण्याची बिशाद कोणाची आहे असा उच्च रवातील सवाल काश्मीरमधील नेते आणि त्यांच्या बरोबरीने काँग्रेसचे नेते छातीठोकपणे करीत असत. काश्मीर खोऱ्यात कलम ३७०चे अवडंबर कायमस्वरूपी राहील असेच सारे समजून चालले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेवर आल्यानंतर कालचक्र जणू उलटे फिरवले. काश्मीर खोऱ्यातील कलम ३७०चा जागच्या जागी निकाल लावून तेथील जनतेला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम मोदी सरकारनेच केले. शतकानुशतके भिजत पडलेले अयोध्येतील राम मंदिराच्या संघर्षाचे घोंगडे अखेर पंतप्रधान मोदी यांनीच स्वच्छ धुऊन वाळत टाकले. आज पूर्ण दिमाखात अयोध्येमध्ये श्री रामलल्लाचे मंदिर झगमगत उभे राहिले आहे. दररोज लक्षावधी भक्त तेथे गर्दी करू लागले आहेत. राहता राहिला प्रश्न समान नागरी कायद्याचा. भारतीय स्वातंत्र्याच्या पाऊणशे वर्षांपैकी सहा दशके काँग्रेस राजवटीने लांगुलचालनाच्या राजकारणात वाया घालवली. अन्य धर्मीयांचे कोडकौतुक करताना आपण स्वधर्मीयांनाच झिडकारतो आहोत. त्यांच्या गरजा किंवा त्यांच्या भावना पायदळी तुडवतो आहोत याचेही भान काँग्रेस राजवटीला राहिले नाही. मोदी सरकारच्या तिसऱ्या टर्ममध्ये ही चूक आता दुरूस्त होणार आहे. भाजपच्या संकल्पपत्रामध्ये समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीचे वचन देण्यात आले आहे. या वचनांना खूप मोठे मोल आहे. बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी अशातला हा प्रकार नव्हे, कारण ही मोदींची गॅरंटी आहे. भारतातील जनता या घटकेला फक्त पंतप्रधान मोदी यांच्याच शब्दावर विश्वास ठेवते ही वस्तुस्थिती आहे. पंतप्रधान मोदींनी गेल्या दहा वर्षांत गरीब जनतेसाठी खूप काही करून दाखवले. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्यापासून चांद्रयानापर्यंत अनेक भरीव कामे त्यांनी केली. दिलेला प्रत्येक शब्द पाळला, किंबहुना आजवरचे सर्वाधिक विश्वासार्ह पंतप्रधान म्हणून त्यांचा लौकिक इतिहासात कायम राहील. या उलट काँग्रेसच्या जाहीरनाम्यात कल्पनेच्या भराऱ्या आणि कोरड्या आश्वासनांपलीकडे काहीही नाही. सत्तेवर येणार नसल्यामुळे वाट्टेल ती आश्वासने हवेत उधळायला इंडिया आघाडीचे काहीच जात नाही. कोणाचा शब्द खरा मानायचा? इंडिया आघाडीतील पराभूत नेत्यांचा की सदैव गोरगरीब आणि युवकांसोबत उभ्या असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा प्रश्नच आता उरलेला नाही. त्याचे उत्तर भारताच्या जनतेने दहा वर्षांपूर्वीच देऊन टाकले आहे.

# कोथुर्डे धरण आटतेय; महाडला पाणीटंचाईच्या झळा



खबरबात
महेश शिंदे

महाड शहरातील बहुतांश भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या तसेच परिसरातील २२ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या कोथुर्डे धरणातील पाणी चालू वर्षी कमी पर्जन्यमापन झाल्यामुळे यंदा एप्रिल महिन्यातच आटत आले आहे. त्यामुळे सध्या महाड शहरासह २२ गावांना पाणीटंचाईची झळ बसत आहे.

महाड शहरासह तालुक्यातील २२ गावे कोथुर्डे धरणातील पाण्यावर अवलंबून आहेत. यंदा धरण क्षेत्रात कमी पाऊस झाल्याने फेब्रुवारी महिन्यातच या धरणाच्या पाण्याची पातळी घटली होती. काही दिवसांपूर्वी या धरणात फक्त दहा ते बारा टक्के पाणीसाठा शिल्लक होता, मात्र आजच्या घडीला या धरणाच्या पाण्याची पातळी घटल्याने महाड शहर आणि परिसरातील २२ गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे. शहरास एमआयडीसी व कुर्ला धरणातून पाणीपुरवठा केला जातो. एमआयडीसीचे पाणी कारखाना वळविण्यात येत असल्याने अचानक पुरवठा कमी होऊ शकतो, तर कुर्ले हे महाड नगरपालिकेचे मालकीचे धरण असून खूप जुने आहे. गाळ आणि गळतीमुळे ते बेभरोशाचे आहे. त्यामुळे शहराच्या ८० टक्के भागाला पाणीपुरवठा करणारे कोथुर्डे हे एकमेव धरण आहे, मात्र २२ गावेदेखील या धरणातील पाण्यावरच अवलंबून असतात. त्यामुळे या गावांना पाणीटंचाईची झळ बसण्यास सुरवात झाली आहे.

महाड शहराला प्रामुख्याने कोथुर्डे धरणातून पाणीपुरवठा होतो. याशिवाय कुर्ले धरण व एमआयडीसी येथूनही काही प्रमाणात शहरातील पुर्वेकडील व उत्तरेकडील भागात पाणीपुरवठा होतो. या चारही ठिकाणाहून दररोज ४० लाख लिटर्स पाणी नगरपालिका शहराला पुरविते. कोतुर्डे धरणातील पाण्यावर महाड शहराप्रमाणे या परिसरातील केंबुर्ली, दासगाव, वहूर, मोहोप्रे, गांधारपाले, लाडवली, नाते, खर्डी, चापगाव, तळोशी, नांदगाव खुर्द, नांदगाव बुद्रुक, करंजखोल, तेटघर, कोकरे, आचलोळी इत्यादी गावांनादेखील पाणीपुरवठा केला जातो. यंदा या धरणाच्या पाण्याची पातळी एप्रिल महिन्यातच खालावल्यामुळे या २२ गावांना पाणीटंचाईची झळ बसण्यास सुरुवात झाली आहे.

या गावांना सध्याच्या परिस्थितीत पाण्याचे इतर काही पर्याय नसल्याने शासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केल्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. महाड शहराला प्रामुख्याने कोथुर्डे धरणातून पाणीपुरवठा होतो. याशिवाय कुर्ले धरण व एमआयडीसी येथूनही काही प्रमाणात शहराला पाणीपुरवठा होतो. त्यामुळे सध्यातरी पाणीटंचाई जाणवली नसली तरी नगरपालिकेला एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करावे लागले.

कोथुर्डे धरणातील पाण्याच्या क्षमता २.७२ दशलक्ष घनमीटर एवढी आहे. वर्षभरासाठी महाड शहराला १.११ आणि २२ गावांसाठी ०.६८ दशलक्ष घनमीटर म्हणजे १.८० एवढी पाण्याची गरज आहे. दरवर्षी पन्नास टक्के धरणातील पाणी शिल्लक अपेक्षित आहे, पण महाड शहरासाठी धरणातून थेट पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा केला जातो, तर २२ गावांच्या पाणीपुरवठा करणाऱ्या जॅकवेल या कोतुर्डे धरण ते महाड शहरापर्यंत जवळपास १२ किमी अंतरापर्यंत आहेत. त्यामुळे या गावांच्या पाणी पुरवठ्यासाठी धरणातून पाणी नदीपात्रात सोडावे लागते, मात्र सोडण्यात आलेले पाणी प्रवाहात पाणी बाष्पीभवन, इतर मार्गाने वाया जाते. मोठ्या प्रमाणात हे होत असल्याने पन्नास टक्के पाणी दरवर्षी वाया जात आहे.

ज्या प्रमाणे महाड शहराला थेट धरणातून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा केला जातो त्याचप्रमाणे या २२ गावांनादेखील लाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा केला गेला तर भविष्यात महाड शहर आणि या २२ गावांचा पाणी प्रश्न कायम मार्गी लागेल, मात्र या वर्षी नियोजन अभावी महाडवर पाणीटंचाईची टांगती तलवार लटकत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### सॅमसंगच्या 'या' स्मार्टफोनमध्ये येणार एआय फिचर्स




आजकाल सर्वत्र आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयची चर्चा सुरू आहे. एआयद्वारे अनेक लोकांच्या कामाची पद्धत अधिक साधी, सोपी, सरळ व्हावी हा यामागचा उद्देश आहे. काही दिवसांपूर्वी सॅमसंग कंपनीने ७० टक्के वीज बचत करणारी ऑटोमॅटिक एआय वॉशिंग मशीन लाँच केली होती, तर १७ जानेवारी २०२४ रोजी सॅमसंगने कॅलिफोर्नियातील एसएपी सेंटर येथे आयोजित गॅलेक्सी अनपॅक्ड इव्हेंटदरम्यान सॅमसंग गॅलेक्सी एस२४ सीरिज लाँच केली. या सीरिजच्या तिन्ही स्मार्टफोनमध्ये एआय फीचर्स दिले आहेत.

आता कंपनी सॅमसंगच्या इतर फ्लॅगशिप स्मार्टफोन्स आणि डिव्हाइजमध्येसुद्धा एआय फीचर्स घेऊन येणार आहे, तर आज आपण या लेखातून सॅमसंगच्या कोणत्या डिव्हाइजमध्ये एआय फीचर्स असणार आहेत हे पाहू.

सॅमसंग कंपनीने अलीकडेच गॅलेक्सी एस २३ सीरिज, एस २३ एफई, झेड फोल्ड ५, झेड फ्लिप ५ आणि टॅब एस ९ सीरिज यांसारख्या उपकरणांसाठी गॅलेक्सी एआय १ फीचर्सची उपलब्धता जाहीर केली आहे.

९ ते ५ गुगल, अँड्रॉइड सेंट्रल आणि द व्हर्जने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार सॅमसंग त्यांच्या जुन्या फ्लॅगशिप डिव्हाइसेससाठी वन युआय ६.१ अपडेटद्वारे गॅलेक्सी एआय फीचर्स आणण्यास सुरुवात करणार आहे. एस२२, एस२२ प्लस, एस२२ अल्ट्रा, झेड फोल्ड ४, झेड फ्लिप ४, टॅब एस ८, टॅब एस८ अल्ट्रा यांसह गॅलेक्सी एआयची ट्रिम-डाउन आवृत्ती, इन्स्टंट स्लो-मो फीचर्स वगळून सॅमसंगच्या फ्लॅगशिप डिव्हाइसेससाठी एआय फीचर्स रिलीज होणार आहे.

एकूणच हल्ली तंत्रज्ञान वेगाने पुढे जात आहे. या युगात सध्या एआयची चलती आहे. सर्व क्षेत्रांमध्ये एआयचा वापर केला जात आहे. मग मोबाईल कंपन्या तरी कशा मागे राहतील. त्या हे तंत्रज्ञान वापरून फिचर्स देत आहेत.

# विनोदी अभिनेता, दिग्दर्शक चार्ली चॅपलिन



## निमित्त

सर चार्ल्स स्पेन्सर चॅप्लिन हा एक इंग्रजी कॉमिक अभिनेता, चित्रपट निर्माता आणि संगीतकार होता, जो मूक चित्रपटाच्या युगात प्रसिद्ध झाला. तो त्याच्या स्क्रीन व्यक्तिरेखेद्वारे, ट्रॅम्पद्वारे जगभरात एक आयकॉन बनला आणि चित्रपट उद्योगातील सर्वात महत्वाच्या व्यक्तींपैकी एक मानला जातो. त्याची कारकीर्द ७५ वर्षांहून अधिक काळ, व्हिक्टोरियन युगातील बालपणापासून ते १९७७मध्ये त्याच्या मृत्यूच्या एक वर्षापूर्वीपर्यंत आणि त्यात प्रशंसा आणि विवाद दोन्ही समाविष्ट आहेत.

लंडनमधील चॅप्लिनचे बालपण गरिबी आणि कष्टमय होते. त्याचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी झाला. त्याचे वडील अनुपस्थित होते आणि त्याची आई आर्थिकदृष्ट्या संघर्ष करत होती. त्याला नवव्या वयाच्या आधी दोनदा वर्कहाऊसमध्ये पाठवण्यात आले होते. जेव्हा तो १४ वर्षांचा होता तेव्हा त्याची आई मानसिक आश्रयासाठी वचनबद्ध होती. चॅप्लिनने लहान वयातच परफॉर्म करण्यास सुरुवात केली. म्युझिक हॉलमध्ये फेरफटका मारला आणि नंतर स्टेज अभिनेता आणि कॉमेडियन म्हणून काम केले. १९व्या वर्षी, त्याला फ्रेड कार्नो कंपनीशी करारबद्ध केले गेले, जे त्याला युनायटेड स्टेट्सला घेऊन गेले. त्यांना चित्रपट उद्योगासाठी शोधण्यात आले आणि कीस्टोन स्टुडिओसाठी १९१४मध्ये ते दिसू लागले. त्याने लवकरच ट्रॅम्प व्यक्तिमत्त्व विकसित केले आणि मोठ्या चाहत्यांना आकर्षित केले. त्याने स्वत:चे चित्रपट दिग्दर्शित केले आणि एस्साने, म्युच्युअल आणि फर्स्ट नॅशनल कॉर्पोरेशनमध्ये गेल्यावर त्याने आपली कला आणखी वाढवत राहिली. १९१८पर्यंत ते जगातील सर्वात प्रसिद्ध व्यक्तींपैकी एक होते.

१९१९मध्ये चॅप्लिनने युनायटेड आर्टिस्ट्स या वितरण कंपनीची सह-स्थापना केली. ज्याने त्यांना त्यांच्या चित्रपटांवर पूर्ण नियंत्रण दिले. द किड, त्यानंतर अ वुमन ऑफ पॅरिस, द गोल्ड रश आणि द सर्कस हा त्यांचा पहिला वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट होता. त्यांनी सुरुवातीला १९३०च्या दशकात ध्वनी चित्रपटांकडे जाण्यास नकार दिला, त्याऐवजी सिटी लाइट्स आणि मॉडर्न टाईम्स संवादाशिवाय तयार केले. द ग्रेट डिक्टेटर हा त्याचा पहिला ध्वनी चित्रपट होता, ज्याने डॉल्फ हिटलरवर व्यंगचित्र केले होते. १९४०चे दशक चॅप्लिनसाठी वादग्रस्त ठरले आणि त्याची लोकप्रियता झपाट्याने कमी झाली. त्याच्यावर कम्युनिस्ट सहानुभूती असल्याचा आरोप होता तसेच पितृत्वाच्या दाव्यात आणि तरुण स्त्रियांशी लग्न केल्याबद्दल प्रेस आणि लोकांच्या काही सदस्यांना बदनाम केले गेले. एफबीआयचा तपास उघडण्यात आला आणि चॅप्लिनला अमेरिका सोडून स्वित्झर्लंडमध्ये स्थायिक होण्यास भाग पाडले गेले. त्याने त्याच्या नंतरच्या चित्रपटांमध्ये ट्रॅम्पचा त्याग केला, ज्यात मॉन्सियर वर्डाँक्स, लाइमलाइट, अ किंग इन न्यूयॉर्क आणि Countess from Hong Kongयांचा समावेश आहे.

चॅप्लिनने त्यांच्या बहुतेक चित्रपटांचे लेखन, दिग्दर्शन, निर्मिती, संपादन, अभिनय, आणि संगीत दिले. तो एक परिपूर्णतावादी होता आणि त्याच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे त्याला चित्राच्या विकासावर आणि निर्मितीवर अनेक वर्षे घालवता आली. त्याच्या चित्रपटांमध्ये पॅथोससह स्लॅपस्टिकचे वैशिष्ट्य आहे जे ट्रॅम्पच्या प्रतिकूलतेविरुद्धच्या संघर्षांमध्ये वैशिष्ट्यीकृत आहेत. अशा या कलाकाराचा २५ डिसेंबर १९७७ रोजी मृत्यू झाला. (साभार : इंटरनेट)


## क्लिक...क्लिक...!



अलिबाग : लोकसभा निवडणुकीदरम्यान मतदान जनजागृतीसाठी नुकतीच वॉक फॉर वोट रॅली काढण्यात आली होती.

## आरोग्य प्रहर

### किंचाळणे, ओरडणे आरोग्यासाठी चांगले



एखादी व्यक्ती किंचाळत असेल किंवा सतत ओरडत असेल, तर आपल्याला वैताग येतो, पण तुम्हाला माहीत आहे का भावनिकदृष्ट्या निरोगी आणि तणावमुक्त राहण्यासाठी ओरडणे फायदेशीर ठरू शकते. तुम्हाला हे वाचायला विचित्र वाटेल, पण संशोधनातून असे समोर आले की ओरडल्यामुळे व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर चांगले परिणाम दिसून येतात.

ओरडणे हे वेगवेगळ्या पद्धतीचे असू शकते. काही प्रकारांमध्ये जेव्हा व्यक्ती ओरडते त्यावरून लक्षात येते की, त्यांना उपचाराची गरज आहे. अशा वेळी रुग्णाला जुन्या किंवा बालपणीच्या वाईट गोष्टी किंवा अनुभव पुन्हा आठवून ओरडण्यास सांगितले जाते आणि त्याशिवाय त्यांना ओरडण्यासाठी खास खोली दिली जाते, ज्याला वैद्यकीय भाषेत 'स्क्रीम रूम' म्हणतात. यांसारख्या उपचार पद्धतीमुळे रुग्ण लवकर मानसिक तणावातून बाहेर पडतो. असे ओरडणे आरोग्यासाठी चांगले आहे.

जेव्हा तुम्ही ओरडता, तेव्हा तुमचा आवाज ताणला जातो आणि त्यामुळे रक्तदाब वाढू शकतो याशिवाय रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊ शकते. गायक आणि शिक्षक जे वारंवार त्यांच्या आवाजाचा वापर करतात. त्यांना व्होकल कॉर्ड नोड्युलआजार होण्याची शक्यता असते.

डॉ. पाताडे यांनी ओरडणे संयमितपणे भावना व्यक्त करण्यासाठी वापरल्यास तणावमुक्त करण्याचा उत्तम मार्ग असल्याचे सांगितले आहे. पुढच्या वेळी तुम्हाला मनाच्या शांततेसाठी ओरडण्याची इच्छा होईल तेव्हा एक सुरक्षित जागा शोधा. लक्षात ठेवा, ओरडणे ही उपचार पद्धत वाद निर्माण करण्यासाठी नाही, तर भावना व्यक्त करण्याचा तो एक पर्याय आहे.

जर तुम्ही दीर्घकाळ तणावात असाल किंवा मानसिक आजाराशी संघर्ष करीत असाल, तर तज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे.

# खासदार सुनील तटकरेंना मताधिक्य देणार

## निजापूरच्या सभेत आमदार भरत गोगावले यांची ग्वाही

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा निवडणुकी संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), भाजप, शिवसेना, आरपीआय महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ निजामपूर येथील महायुतीची सभा उत्साहात झाली. आमदार भरत गोगावले म्हणाले की, आम्ही विकासाच्या जोरावर मते मागतोय असे सांगत या निवडणुकीत महाड विधानसभामतदार संघातून सुनील तटकरेंना प्रचंड मताधिक्य देणार, असा विश्वास व्यक्त केला. तर महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे म्हणाले की, अनंत गीते आजची सभा बघून निजामपूरमध्ये सभा घेण्याचे धाडस करणार नाहीत.



३२ रायगड – रत्नागिरी लोकसभा मतदार संघाची निवडणूक ७ मे रोजी होत असून या निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन महाड विधानसभा मतदार संघातील निजामपूर येथे ए वन क्रिकेट क्लबच्या मैदानावर करण्यात आले होते. या जाहीर सभेला खासदार सुनील तटकरे, आमदार भरत गोगावले, युवासेना नेते विकास गोगावले, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्त्या अ‍ॅड. सायली दळवी, शिवसेना नेते अ‍ॅड. राजीव साबळे, शिवसेनेचे संपर्क प्रमुख अरुण चाळके, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष फैसल पोपेरे, जेष्ठ नेते विजय सावंत, निजामपूर सरपंच राजाभाऊ रणपिसे, युवा सेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, मानसे जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे महाड विधानसभा मतदार संघ अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर, तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष सुभाष केकाणे, निजामपूर विभाग अध्यक्ष संदीप जाधव, जिल्हा राष्ट्रवादी उपाध्यक्ष अनंता महाडिक, तालुका प्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, शिवसेना जिल्हा महिला अध्यक्षा निलीमा घोसाळकर, माजी उपसभापती तुकाराम सुतार, माजी पंचायत समिती सदस्य सुधीर पवार, तरुण मराठी उद्योजक सुभाष दळवी, भाजपचे तालुका सरचिटणीस गोविंद कासार, अविनाश नलावडे, राजेंद्र शिर्के, सुनील पवार, राजेश कदम, नितीन पवार, महेश कोंडेकर, प्रताप घोसाळकर, किरण पागार, हमजा जळगावकर, देविका पाबेकर, अरुणा वाघमारे, गणेश समेळ, सागर खानविलकर आदींसह हजारोंच्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते व जनसमुदाय उपस्थित होता.

या वेळी मार्गदर्शन करताना महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे पुढे म्हणाले की, राजकारणात फेरबदल हे होत असतात. नवीन समीकरणे येत असतात. नवनवीन समीकरणे महाराष्ट्राच्या राजकारणात तयार झालेले आपल्या सर्वांना पाहायला मिळत आहे. माझ्या ४० वर्षांच्या राजकीय प्रवासात या निजामपूर विभागासाठी मला काम करता आले याठिकाणी मूलभूत सुविधा निर्माण करण्यात मला यश आले. या निजामपूर विभागाला माझ्यापेक्षा काकणभर जास्त न्याय देण्याचा प्रयत्न भरतशेठनी केला आहे. नवीन राजकारण देशाच्या हिताच्या दृष्टीने महतवाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे नेतृत्व करीत असून चांगले काम त्यांच्या नेतृत्वाखाली देशात होत आहे. आपल्याला भरतशेटच्या रूपाने विकासाचा जादूगार या मतदारसंघात पाहायला मिळत आहे.

आमदार भरत गोगावले आपल्या मार्गदर्शनात बोलताना म्हणाले की, नरेंद्र मोदसाहेबांना पुन्हा देशाचे पंतप्रधान करण्यासाठी आपल्याला सुनील तटकरे यांना निवडून द्यायचे आहे. आम्ही केलेल्या विकासकामांच्या जोरावर मते मागतोय. महाड मतदार संघातील असा एकही वाडी, वस्ती, गाव शिल्लक राहिलेला नाही जिथे आपला विकास काम नाही. या सरकारने महिलांसाठीही विविध योजना राबविल्या. जे रायगड मतदार संघाचे सहा वेळा खासदार झाले व दोन वेळा केंद्रात मंत्री झाले त्यांना एकही काम या मतदार संघात करता आले नाही. आता ते तुमच्या दारोदारी मते मागायला येत आहेत. त्यांना मते मागण्याचा कोणताही अधिकार नाही. खासदार कसा असावा तर तो सुनील तटकरे यांच्यासारखा असावा असे ते म्हणाले.

युवासेना नेते विकास गोगावले, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्त्या अ‍ॅड. सायली दळवी, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख अरुण चाळके, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, माजी उपसभापती तुकाराम सुतार, निजामपूरचे सरपंच राजाभाऊ रणपिसे यांनीही या वेळी मार्गदर्शन केले.

# कर्जत पोलिसांकडून चोरी, घरफोडीच्या आरोपींना अटक

## मुद्देमाल मूळ मालकांना केला सुपूर्द

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत पोलिसांनी जबरी चोरी व घरफोडीच्या अशा दोन गुन्हयातील आरोपींना अटक करून गुन्हयातील दोन लाख २६ हजार ५०० रूपये किमतीचा मुद्देमाल मूळ मालकांना केला परत आहे. या गुन्ह्यांचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरीक्षक यांनी लावला. जबरी चोरीचा तपास केवळ चार महिन्यात व घरफोडीचा तपास केवळ अडीच महिन्यात लावण्यात कर्जत पोलिसांना यश आले आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीमध्येत १२ डिसेंबर २०२३ रोजी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये मुलांना सोडण्यासाठी आलेल्या तीन महिलांचे गळ्यातील सोन्याचे दागिने दोन अज्ञात चोरट्यांनी मोटरसायकलवरून पाठीमागुन येवून जबरीने खेचून चोरी करून पसार झाल्या बाबतचा गुन्हा कर्जत पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आलेला होता गुन्हा उघडकीस आणण्याकरीता तत्कालीन उप विभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे व पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी तयार केलेल्या तपास पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रीक पुरावे व गोपनिय बातमीदाराचे मदतीने गुन्हयातील आरोपीत यांना अटक करून त्यांचेकडुन जबरी चोरी करून नेलेला ९१ हजार ५०० रुपये किमतीचे दागीने हस्तगत केले आहेत.

यासोबतच १ फेब्रुवारी २०२४ रोजी साई गणेश अपार्टमेंट सी विंग रूम नं.१०४, मालवाडी रोड, नानामास्तर नगर, कर्जत येथे राहणारे दिलीप रामचंद्र भोईर यांचे बंद फ्लॅटचा कडी कोयंडा तोडुन घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकूण एक लाख ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल दिवसा घरफोडी चोरी करून नेले बाबत अज्ञात चोरट्याविरूध्द कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याची पोलीस अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या तपास पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे व गोपनिय बातमीदाराचे मदतीने गुन्हयातील आरोपीत यांना अटक करून आरोपीत यांनी घरफोडी चोरी करून नेलेल्या मुद्येमालापैकी एक लाख ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व गुन्हा करणेसाठी वापरलेली एक हिरो होंडा कंपनीची पॅशन प्रो मॉडेलची मोटरसायकलदेखील जप्त करण्यात आली आहे.

या दोन्ही गुन्हयातील हस्तगत करण्यात आलेला एकूण दोन लाख २६ हजार ५०० रूपये किमतीचा मुद्देमाल न्यायालयाचे आदेशाने मुद्देमालाचे मुळ मालकांच्या ताब्यात देण्यात आलेला आहे.

# 'मतदारांना पारदर्शक निष्पक्ष निवडणुकीचा विश्वास देता येईल'

**अलिबाग : प्रतिनिधी**

नागरिक मतदारांना पारदर्शक निष्पक्ष निवडणुकीचा विश्वास देतानाच त्यांना मतदानासाठी मोकळेपणाने सहभागी होण्यासाठी सजग राहून प्रेरणा देता येईल, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे निवडणूक खर्च निरीक्षक धिरेंद्रमनी त्रिवेदी यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात जिल्हा निवडणूक खर्च सन नियंत्रण व व्यवस्थापन समिती (डीइएमसी) अंतर्गत प्रशिक्षण व आढावा बैठक झाली. या वेळी ते बोलत होते. या वेळी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे, जिल्हा निवडणूक प्रशिक्षण कक्षाच्या नोडल अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी जोस्ना पडियार, जिल्हा खर्च सनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजेंद्र कदम, सर्व विधानसभा मतदार संघातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक खर्च निरीक्षक आदी उपस्थित होते.

निवडणूक खर्च निरीक्षक त्रिवेदी म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या वतीने पारदर्शक, स्वतंत्र, निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया होण्यासाठी कार्यवाही केली जात असून यामध्ये सगळ्यांचा सहकार्य आवश्यक आहे. उमेदवारांच्या निवडणूक खर्च नोंदविला जाणे गरजेचे आहे. कोणता राजकीय प्रचार खर्च आहे याचा सद्विवेक बुद्धीने विचार करून कर्तव्य पूर्ण केले जावे.

मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले, संविधानकर्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यांना अभिप्रेत लोकशाही साठी निवडणूक यंत्रणेतील आपण त्यांच्याप्रती उत्तरदायी आहोत. निवडणूक कालावधीमध्ये नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारांना आणि सण उत्सवांना अडचण होणार नाही याची देखील काळजी घेतली गेली पाहिजे, परंतु यामध्ये राजकीय उमेदवार व पक्ष निवडणूक निवडणुकीचा प्रचार करत असतील तर त्याच्या सनियंत्रण व देखरेखीचे काम बिनचुक व बारकाईने व्हावे, असे खर्च निरीक्षक त्रिवेदी म्हणाले.

मतदान प्रक्रिया व निवडणुकीसाठी निवडणूक खर्च निरीक्षक सहाय्यक खर्च निरीक्षक लेखापथक यांच्यासोबत व्हिडिओ निरीक्षण पथक, भरारी पथक, तक्रार निवारण व नियंत्रण कक्ष, माध्यम सनियंत्रण व प्रमाणीकरण समिती सुसज्ज सुसज्ज करण्यात आले आहे. मतदारसंघांमध्ये येणारे स्टार प्रचारक त्यांचा खर्च, आचारसंहिता नियमांचे उल्लंघन, समाज माध्यम, स्थानिक वार्तापत्रातील पेड न्यूज, प्रचारात केला जाणारा कायदेशीर व बेकायदेशीर खर्च, प्रचार वाहने, जाहिराती, पैसा व गैरबाबींचा वापर आदी अनुषंगाने अभ्यासपूर्ण सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

# राठी कॉलेजमध्ये करिअर मेळावा

**रोहे : प्रतिनिधी**

जे. एम. राठी इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये 'उडान' करिअर मेळाव्याचे आयोजन केले आहे. शनिवारी (दि. २०) सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत स्कुलच्या सभागृहात हा करिअर मार्गदर्शन मेळावा होणार आहे.

या मेळाव्यामध्ये विविध ज्ञानशाखांशी निगडित असणाऱ्या विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तसेच करिअरसंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यासाठी नावनोंदणी अनिवार्य असून, प्रवेश निश्चितीसाठी १०० रुपये शुल्क आहे. विद्यार्थ्यांसह त्यांचे पालकही मेळाव्याला उपस्थित राहू शकतात. पालकांना कोणत्याही नोंदणीची आवश्यकता नाही. नोंदणीसाठी https://www.jmreschool.com/UniversityFair.aspx या लिंकला भेट द्यावी अथवा अधिक माहितीसाठी शाळेच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.


## एसटी. प्रवर्गासाठी फ्लॅट विकणे आहे.

फ्लॅट क्र. २०२, बिल्डिंग नं. १, वास्तु विहार, के एच-१, सेक्टर-१६ खारघर, नवी मुंबई (क्षेत्रफळ कारपेट - ३०२-५८ स्के.फुट)
संपर्क :- अमित - ८६९८८८८८८८/९११२१११११११

## महावितरण — जाहीर निवेदन

गोरेगाव विभागांतर्गत महाड व पोलादपूर तालुक्यातील महापारेषण कंपनीच्या २२०/२२ केव्ही उपकेंद्रामधून निघणाऱ्या २२ केव्ही वीज वाहिनीची पावसाळ्या पूर्वीची देखभाल दुरुस्तीचे कामे करण्याकरिता दिनांक १६.०४.२०२४ रोजी खालील नमूद २२ केव्ही वीज वाहिनी बंद करण्यात येणार आहेत. तरी महाड व पोलादपूर तालुक्यातील सर्व वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी.

| वीज वाहिनी/फिडरचे नाव | वेळ | बाधित होणारे क्षेत्र |
|---|---|---|
| १. २२ केव्ही बिरवाडी वाहिनी | -०९.०० ते १४.०० | -बिरवाडी, वरंध ता. महाड |
| २. २२ केव्ही पोलादपूर शहर वाहिनी (तुर्भे स्वीचिंग) | -१४.३० ते १८.०० | - पोलादपूर पूर्ण उपविभाग |
| ३. २२ केव्ही एम.आय. डी.सी. ग्रामीण वाहिनी | -१४.३० ते १८.०० | - जिते, टेमघर, खैरे व इतर गावे |
| ४. २२ केव्ही एम.आय. डी.सी. १ वाहिनी | -०९.०० ते १४.०० | - एम.आय.डी.सी. महाड |
| ५. २२ केव्ही एम.आय. डी.सी. २ वाहिनी | -०९.०० ते १४.०० | - एम.आय.डी.सी. महाड |
| ६. २२ केव्ही जीबीएल वाहिनी | -१०.०० ते १४.०० | - जी बीएल उपकेंद्र, MIDC महाड |

**कार्यकारी अभियंता**
**महावितरण गोरेगाव विभाग**

## पेपर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **प्रकाश गुरूनाथ पाटील व इतर** यांचेकडून **श्री. उदय अनंत तायशेटे** कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **प्रकाश गुरूनाथ पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे : पिरकोन (५५३३३९)
(ULPIN २०६३८१४८३७७), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २१८/२/अ | १ | ०.३१.९० पो.ख. ०.०२.१० | ३.५० |
| | | एकुण ०.३४.० ० | |

या एकुण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.३४.०० गुंठे

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १३ एप्रिल २०२४

**सही/-**
**अ‍ॅड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी. एच. एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड - ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे - शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| शिवकर | गणा गोविंद टोपले जान्या गोविंद टोपले समंती देणार | ७८ | ३ | ०-४५-३० पो.ख ०-०१-३० | ४.३७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

ता. १०/०४/२०२४
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**अ‍ॅड. प्रधान मधूकर पाटील**

१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२


## अधिसूचना

पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिल क्र. ८५१९/२००६ चे प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने अनधिकृत धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करणे / नियमित करणे / स्थलांतरित करणे या अनुषंगाने निर्देश तसेच महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीटीएम-०९०९/प्र. क्र. ५५८/ (भाग २) / विशा-१ व दिनांक ०५ मे, २०११ चे अनुषंगाने, मी जिल्हाधिकारी रायगड, जी अधिसूचना काढण्यांचे योजित आहेत, त्या अधिसूचनेचा खालील मसुदा सर्व नागरिकांच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येते आहे.

## अधिसूचनेचा मसुदा

सिडको प्राधिकरणाचे हद्दीतील पनवेल तालुक्यातील उलवे नोड म्हणून नमूद असलेल्या विभागामधील ४४ अनधिकृत धार्मिक स्थळांची वर्गीकृत यादी, तसेच उरण तालुक्यातील उरण - द्रोणागिरी नोड येथील ०८ अनधिकृत धार्मिक स्थळांची वर्गीकृत यादी या कार्यालयाकडील https://raigad.gov.in या संकेतस्थळावरती प्रसिध्द केली आहे. **अ वर्गीकरणातील** - नियमितीकरणास प्रस्तावित असलेली. **ब वर्गीकरण असलेली** - नियमितीकरण करणे शक्य नसलेली व **क वर्गीकरण असलेली-** स्थलांतरण करणेस पात्र असलेली धार्मिक स्थळे असून, त्याबाबत वर्गीकरण निहाय नियमतीकरण, निष्कासन व स्थलांतरणाची कारवाई प्रस्तावित करणेत येत आहे. अशा वर्गीकरणाबाबत कोणाला काही आक्षेप किंवा हरकत असल्यास, ते त्यांनी उक्त अधिसूचना प्रसिध्द झालेपासून पुढील एक महिन्याच्या कालावधीमध्ये जिल्हास्तरीय समितीकडे जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग येथे पुरावे / कागदपत्रे यांसह सादर करावेत. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेप / हरकती याबाबत विचार केला जाणार नाही, याबाबत नोंद घ्यावी. मा. जिल्हाधिकारी सो यांचे मान्यतेने.

स्थळ :- अलिबाग
दिनांक :- १५.०४.२०२४.

**सही/-**
**(संदेश शिर्के)**
निवासी उपजिल्हाधिकारी रायगड
अलिबाग

क्र. जिमाका/राअ/जाहि./०२/२०२४-२५

# तापमानात वाढ झाल्याने काळजी घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातील तापमानात वाढ झाल्याने उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. उष्णतेच्या ताटेमुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी दुपारच्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडू नये. आपली आणि आपल्या कुटुंबियांची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. दरम्यान, राज्यात सोमवारी (दि. १५) पनवेल तालुक्याचे तापमान सर्वाधिक ४३ अंश सेल्सिअर्सपर्यंत गेले होते.

बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की, शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. उष्माघात झाल्यावर चक्कर येणे,



## पनवेलचे तापमान सर्वाधिक ४३ अंश

मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे स्नायूंना आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क करावा.

उष्माघात होऊ नये म्हणून तहान लागलेली नसली तरीसुद्धा जास्तीत जास्त पाणी प्यावे, हलकी, पातळ व सच्छिंद्र सुती कपडे वापरावेत, बाहेर जातांना गॉगल्स, छत्री/टोपी, बूट व चपलांचा वापर करण्यात यावा, प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. कोकणातील जनतेने काळजी घ्यावी, असे सांगण्यात आले आहे.

उन्हाळ्यात त्रास होऊ लागल्यास जवळच्या शासकीय जिल्हा रुग्णालय अथवा तालुका किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करावा. अनेक आरोग्य केंद्रात उष्णतेचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय करण्यात आली आहे.

## थंडपेय, फळांना वाढती मागणी

गेल्या आठवडाभरापासून पनवेल शहर आणि परिसरातील तापमान कमालीचे वाढल्याने सारेच हैराण झाल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात शरीराला थंडावा मिळावा म्हणून आता थंड पेयांना मागणी वाढली आहे. आरोग्यपुरक फळांनाही आता चांगला भाव आलेला आहे. ठिकठिकाणी गल्लोगल्लीत बर्फाचे गोळे विक्रेते फिरताना दिसत आहेत. बाजारात लिंबांनाही चांगला भाव आलेला आहे. याशिवाय थंडगार सब्जाही



विकला जात आहे. बाजारात द्राक्षे, कलिंगडांनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे. रसवंतीगृहातही गर्दी होत आहे.

# अग्निशमन दिनानिमित्त शहीद जवानांना आदरांजली



**नवी मुंबई : बातमीदार**

अग्निविमचनाचे काम करीत असताना आपल्या प्राणांचे बलिदान करणाऱ्या शहीदांचा सन्मान ठेवणे हे आपले कर्तव्य असून त्यांच्या स्मृतींपासून अधिक चांगले काम करण्याची ऊर्जा मिळते असे सांगत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शहीद अग्निशमन जवानांच्या स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करीत भावपूर्ण आदरांजली दिली. नवी मुंबई महापालिका अग्निशमन दलाच्या वतीने वाशी अग्निशमन केंद्रात अग्निशमन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी आयुक्तांनी उपस्थित अग्निशमन जवानांशी संवाद साधला.

नवी मुंबई महापालिकेच्या पाच अग्निशमन केंद्राद्वारे शहर सुरक्षिततेची जबाबदारी आपले अग्निशमन दल पार पाडत असून आपत्तीनंतर आपत्ती निवारणाचे कार्य करण्यासोबतच आपत्ती उद्भवूच नये याकरिता नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणारे उपक्रम राबविण्यावर भर द्यावा असे आयुक्तांनी यावेळी सूचित केले. मागील वर्षी पावसाळी कालावधीत इरशाळवाडी येथे आपत्तीप्रसंगी मदतकार्य करताना वीरगती प्राप्त झालेले नवी मुंबई महानगरपालिकेचे सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी शिवराम ढुमणे यांच्याही सेवाभावी समर्पित कार्याचे स्मरण याप्रसंगी आयुक्तांनी केले. या वेळी आयुक्तांप्रमाणेच उपस्थित अतिरिक्त आयुक्त सुनील पवार तसेच अतिरिक्त आयुक्त तथा मुख्य अग्निशमन अधिकारी शिरीष आरदवाड, शहर अभियंता संजय देसाई, उप मुख्य अग्निशमन अधिकारी श्री पुरुषोत्तम जाधव, वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त सागर मोरे, कार्यकारी अभियंता अजय संख्ये, अग्निशमन केंद्र अधिकारी जे. टी. पाटील व जी एस सुसवीरकर आणि इतर अग्निशमन अधिकारी यांनी शहीद वीरांच्या स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले.

१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये एस एस फोर्ट स्टिकीन या जहाजाला लागलेल्या आगीत मुंबई अग्निशमन दलातील ६६ जवानांनी स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन अग्निविमोचनाचे कार्य केले. या शहीद जवानांना तसेच त्यानंतरही अग्नीविमोचनाचे कार्य करताना आपल्या प्राणांचे बलिदान दिलेल्या शहीद जवानांना भावपूर्ण अभिवादन करीत १४ एप्रिल हा दिवस अग्निशमन सेवा दिन म्हणून पालन करण्यात येतो.

या दिनाचे औचित्य साधून १४ ते २० एप्रिल २०२४ या कालावधीत संपूर्ण नवी मुंबई महापालिका क्षेत्रात अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात येत असून या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील मॉल्स, मोठ्या सोसायट्या, हॉस्पिटल्स, शाळा – महाविद्यालये, हॉटेल्स, रेल्वे स्टेशन अशा ठिकाणी अग्निसुरक्षतेच्या दृष्टिकोनातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे तसेच विविध ठिकाणी मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले आहे.

# तुपगाव येथे महामानवाची जयंती उत्साहात साजरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंतीनिमित्त ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव आणि पंचशिल नगर युवक मंडळ तसेच प्रामुख्याने पंचशिलनगर महिला मंडळ तुपगाव यांच्या उपस्थितीत ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, सदस्य सचिन साखरे, सदस्य निलेश मोरे, ग्रामसेवक व कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते महेंद्र सोनवणे, ॲड. राकेश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते किशोर मोरे, सन्नी मोरे, अनिकेत गायकवाड , प्रेम वाघमारे, संघर्ष रोकडे, बचत गट अध्यक्ष भाग्यश्री सोनवणे आदी उपस्थित होते. तर तुपगावमध्ये शिल्पकार युवक मंडळाकडूनही



मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सरपंच रविंद्र कुंभार यांनी ध्वजारोहण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी सरपंच रवींद्र कुंभार यांनी सर्वांना शुभेच्छा देवून भोजनाची व्यवस्था केली होती. या वेळी कांता नागावकर, स्वप्निल नागावकर, योगेश गुरव, नितिन साळुंखे, मनोज गुरव, पोलीस पाटील किशोर गुरव, नंदू सोनावणे आदी उपस्थित होते.

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात महापुरुषांचा संयुक्त जयंती कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय कळंबोली येथील शासकीय इमारतीच्या आवारात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३व्या जयंतीनिमित्त लोकशाही प्रगल्भ करणारे महामानव सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नवी मुंबई पोलीस उपायुक्त संजय कुमार पाटील, सहायक पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे, शांताराम वाघमोडे ॲड. पल्लवी राजपक्षे हजर होते.

ज्येष्ठ कवी, साहित्यिक, विचारवंत उत्तम तरकसे यांचा नुकताच प्रकाशित झालेल्या शाहीची नोंद या काव्यसंग्रहाला नागपूर येथून जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचा पद्मश्री दया पवार



पुरस्कार मिळाल्याने पोलीस उपायुक्त संजय पाटील यांच्या हास्ते सत्कार व सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात पोलीस उपायुक्त पाटील यांनी आपले विचार मांडताना, सर्व पोलीस बांधवांनी वाचन केले पाहिजे. किमान महिन्यात एक तरी पुस्तक वाचले पाहिजे तसेच आपल्या देशाचे संविधान हे सर्व जगात उत्कृष्ट असे संविधान आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय हक्काची जाणीव असण्या करिता संविधानाचे ज्ञान असणे गरजेचे आहे. त्याही उपरोक्त संविधान हे प्रत्येकाच्या घरात ग्रंथरूपाने असायला हवे असे मार्गदर्शन केले.

या वेळी उत्तम तरकसे यांनी सत्काराचे उत्तरदायित्वाचे पालन करत आपले विचार मांडताना प्रत्येक भारतीय नागरिकास स्वातंत्रपणे, स्वाभिमानाने जगण्याचा न्याय्य हक्क संविधानाने प्रदान केला आहे. आपल्या देशाची लोकशाही प्रगल्भ व सर्वश्रेष्ठ आहे असे मोलाचे विचार मांडले तसेच मनोज राजपक्षे यांनी सुद्धा धम्मा बाबतचे तत्व आपल्या विचारात मांडले.

राजश्री पांडव यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात व कायद्यातून महिलांना दिलेल्या अधिकाराबद्दल जाणीव करून दिली आणि प्रत्येक भारतीय महिलेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आभार न मानता त्यांच्या ऋणातच राहावे, असे आपले मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका शुक्ला यांनी केले.

**पनवेल : तोंडरे येथे श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान मंदिराचा सहावा वर्धापन दिन सोहळा १५ ते १८ एप्रिल असा तीन दिवसीय विविध भक्तीमय कार्यक्रमात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना माजी सरपंच राम पाटील यांनी आमंत्रण दिले.**



# मोबाईल चोरणारे दोन जण ताब्यात


**पनवेल :** मोबाईल खेचून पळणाऱ्या दोन आरोपींना खारघर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. खारघर सेक्टर १४ येथील मशीदजवळील पाथवर गैबिसहाब इब्राहिम या मोबाईलमध्ये युट्यूब व्हिडीओ पाहत उभा असताना दोन अज्ञात इसमांनी स्कुटीवरून येऊन इब्राहिमच्या हातातील वन प्लस कंपनीचा महागडा मोबाईल खेचून सेक्टर १९ च्या दिशेने पसार झाला. याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करताच चोरटा व गाडीवरून पोलिसांनी तपास सुरू ठेवला. खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. गणेश जाधव, उपनिरीक्षक ज्ञानोबा धुळगंडे व गुन्हे प्रकटीकरण पथक यांच्या अथक प्रयत्नाने आरोपींना २४ तासांत खारघर हद्दीतून ताब्यात घेतले.

यातील एक आरोपी ३० वर्षांचा असून, दुसरा आरोपी २५ वर्षांचा आहे. आरोपींची चौकशी केली असता ते सराईत गुन्हेगार असल्याचे पोलिसांच्या निर्दर्शनास आले.



**पनवेल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी खारघर आणि तक्का येथे आयोजित कार्यक्रमांना भेट देत अभिवादन केले. या वेळी भाजप जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अजय बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, भाजप खारघर शहर उपाध्यक्ष किरण पाटील, युवा मोर्चाचे खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, सचिव आदित्य हातगे, दीपक ठाकूर, शैलेंद्र त्रिपाठी आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

# आमदार महेश बालदींच्या कामांचा फायदा खासदार बारणेंना होणार



## भाजपच्या किरण माळी यांचा विश्वास

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांनी केलेल्या हजारो कोटींच्या विकासकामांचा फायदा मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांना झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास भाजपचे चावणे, केळवणे जिल्हा परिषद मतदारसंघाचे अध्यक्ष व कराडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किरण माळी यांनी व्यक्त केला.

मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे हे तिसऱ्यांदा निवडणूक लढवित आहेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी आणि अबकी बार चारसो पार आकडा पार करण्यासाठी महायुतीचे उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांना बहुमताने विजयी करा, असे आवाहन किरण माळी यांनी केले आहे.

# पनवेल पंचशील नगरमध्ये भीम जयंती उत्सव



**पनवेल : वार्ताहर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पंचशील नगर रहिवाशी सामाजिक संस्था, नवीन पनवेल यांच्या वतीने १३ ते १६ एप्रिलपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१३ एप्रिल रोजी पंचशील नगर नवीन पनवेल ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पनवेल मिरवणूक काढण्यात आली. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नवीन पनवेल येथे सकाळी ध्वजारोहण व प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. संस्थेमार्फत सायंकाळी मिरवणूक काढण्यात आली. १५ एप्रिल रोजी मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, १६ एप्रिल रोजी जयंती चित्रपट ठेवण्यात आला, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष शंकर वायदंडे यांनी दिली.

उपाध्यक्ष अशोक आखाडे, सचिव राहुल पोपलवार सहसचिव विनोद खंडागळे, संघटक कैलास नेमाडे, अजय दुबे, अमन तायडे, दीपक लोंढे, किरण लोंढे, अनिल पटेकर, सुनील वानखेडे, कुंडलिक माघाडे आदींचे सहकार्य लाभले.







**उलवे नोड : येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या हॉलमध्ये इस्कॉनच्या वतीने शनिवारी श्री गौर पुर्निमा फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभरामध्ये मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम, कीर्तन, भागवत कथा, महाप्रसाद वितरण असे विविध कार्यक्रम झाले. यामध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पुष्पवर्षाव करण्यात आला. या वेळी राधा गोपीनाथ प्रभू, नरसिंम्हा लिला प्रभू, आनंदराम प्रभू, डॉ. विकास मोरे, लिबावनजी, ओमकार कदम, मनोज भोईर, मोनेश सोनार, श्रीनिवास, वैभव, हितेश, आशिष, ओमकार मिश्रा, दीपक यादव, निशांत आदी इस्कॉन मेंबर्स उपस्थित होते.**



# कलगी तुरा रायगड-रत्नागिरी समन्वय समितीचा महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरेंना पाठिंबा



**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, आरपीआय, मनसे व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना कलगी तुरा रायगड-रत्नागिरी जिल्हा समन्वय समितीने पाठिंबा जाहीर केला आहे. समितीचे संस्थापक रामभाऊ टेंबे, अध्यक्ष सुरेश महाबळे व सहकाऱ्यांनी ही घोषणा केली.

या समितीची सभा माणगावच्या कुणबी भवन सभागृहात रविवारी (दि.१४) आयोजित करण्यात आली होती. या सभेत ७ मे रोजी होणाऱ्या रायगड लोकसभा निवडणुकीसंदर्भात चर्चा करण्यात आली. या वेळी समितीचे संस्थापक रामभाऊ टेंबे म्हणाले की, सुनील तटकरे यांचे आपल्याला वेळोवेळी सहकार्य लाभले आहे.आपले विविध प्रश्न, अडीअडचणी सोडविण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत. अध्यक्ष सुरेश महाबळे यांनीही याबाबत सहमती दिली. तेव्हा महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास दाखवून त्यांना सर्वानुमते पाठिंबा देण्याचे येत असल्याचे समितीचे अध्यक्ष सुरेश महाबळे यांनी जाहीर केले.

या वेळी तटकरेसाहेब आगे बढो, तटकरेसाहेब झिंदाबाद अशा घोषणा देण्यात आल्या. समितीच्या या पाठिंब्यामुळे महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना आणखी ताकद मिळाली आहे.

या सभेला समितीचे सचिव सचिन माळी, नथुराम पाष्टे, रामचंद्र म्हात्रे, अरुण नाक्ती, शाहीर वसंत भोईर, सतीश पवार, बाळकृष्ण भोस्तेकार, गोविंद शिंदे, दत्ता सुतार, श्रीधर वाळंज, वामन बैकर, किसान बाटे, रामदास वारिक, शंकर फणसे, बाळा महाबळे, संतोष म्हात्रे आदी उपस्थित होते.


## आज माणगावात सभा

रायगड लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रचारार्थ मंगळवारी (दि. १६) सायंकाळी ७ वाजता माणगाव येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेला मंत्री आदिती तटकरे, आमदार भरत गोगावले, शिवसेना नेते राजीव साबळे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे, शिवसेना तालुकाप्रमुख महेंद्र मानकर, भाजप तालुकाध्यक्ष उमेश साटम, मनसे तालुकाध्यक्ष चिमण सुखदरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या सभेला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, योगिता चव्हाण, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितीन वाढवळ, भाजपचे शहराध्यक्ष नितीन दसवते, शिवसेनेचे शहरप्रमुख सुनील पवार, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, सभापती शर्मिला सुर्वे, नगरसेविका ममता थोरे, भाजप महिला मोर्चा शहराध्यक्ष भारती शेट, शिवसेना महिला शहराध्यक्ष करुणा देसाई यांनी केले आहे.

# खालापुरात तलवार बाळगणारा पोलिसांच्या ताब्यात

**खोपोली : प्रतिनिधी**




विनापरवाना तलवार जवळ ठेवणाऱ्या गणेश बाळू हिलम (रा. विणेगाव देवशेतवाडी, ता. खालापूर) याला खालापूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

गणेश हिलम हा रविवारी (दि.१४) संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून शिवीगाळ करून जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याच्या हालचाली संशयास्पद असल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असता त्याच्या ताबे कब्जात लोखंडी तलवार मिळून आली. विनापरवाना बेकायदा शस्त्र बाळगून मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने त्याच्याविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास शिवाजी जुदंरे करीत आहेत.

# माणगावमधील नाणोरे येथे चोरी

**माणगाव : प्रतिनिधी**

घरातील कपाटातून ८० हजार रुपयांची रोख रक्कम घेऊन अज्ञात चोरटा फरार झाला आहे. ही घटना १० एप्रिल रोजी सकाळी १० ते १४ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान नाणोरे (ता. माणगाव) येथे घडली. या घटनेची फिर्याद महेंद्र तुकाराम पाटोळे (रा. नाणोरे) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली आहे.

या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील अज्ञात चोरट्या इसमाने नाणोरे येथे फिर्यादी महेंद्र तुकाराम पाटोळे यांचे राहत्या घराच्या कपाटातील रोख रक्कम ८० हजार रुपये चोरून नेली.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३८० अन्वये करण्यात आली असून अधिक तपास हवालदार गणेश समेळ करीत आहेत.

# अलिबागमध्ये गाडी अडवून खंडणीची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मांडवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रहाटले येथे भरदिवसा एकाला अडवून व चाकूचा धाक दाखवून त्याच्याकडे २० लाख रुपये खंडणीची मागणी करण्यात आली आणि पोलिसांत तक्रार केल्यास ठार मारण्याची धमकी देण्यात आली. ही घटना नुकतीच घडल्याची फिर्याद मांडवा सागरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी यांना १० एप्रिल रोजी मांडवा रहाटले येथे दुपारी पावणे ४ वाजताच्या सुमारास एक सफेद रंगाच्या कारमधील तीन अनोळखी इसमानी अडवून त्यांच्या पोटाला चाकू लावला व जबरदस्ती आरोपींच्या कारमध्ये बसवले. त्यानंतर २० लाख रुपयांची खंडणी मागितली. तडजोडीअंती सहा लाख मान्य केले.

दरम्यान, फिर्यादीचा पार्टनर पोलीस ठाण्यात चालला असल्याचे आरोपींना कळले. तेव्हा संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास फिर्यादी यांना तीन रस्त्यावर आणून त्यांच्या मोटरसायकलजवळ दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता सहा लाख रुपये आणण्यासाठी सांगून याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार केल्यास फिर्यादीसह त्यांच्या घरातील लोकांना तसेच पार्टनरला ठार मारण्याची धमकी देण्यात आली. अशा प्रकारची तक्रार फिर्यादी यांनी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात नोंदवली आहे. या प्रकरणी मांडवा सागरी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

# पाली येथे मराठा समाजाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## सलोखा कमिटी स्थापन करण्याचा निर्णय

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका मराठा समाजाच्या वतीने विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रविवारी (दि.१४) पाली येथील डॉ. आंबेडकर स्मारकात जाऊन त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी भीम अनुयायांना शुभेच्छादेखील देण्यात आल्या.

सुधागड तालुका मराठा समाज संस्थेच्या ध्येय-धोरणानुसार तालुक्याचा विकास, शांतता तसेच सर्व जाती धर्मात सलोख्याचे वातावरण तयारहोण्यासाठी पुढाकार घेण्याचे ठरविले आहे. यानुसार भविष्यात सलोखा कमिटी स्थापन केली जाणार आहे.



याची सुरुवात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून करण्यात आली आहे. या अनुषंगानेदेखील मराठा समाज बांधवांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले, असे सरचिटणीस सुजित सदाशिव बारसकर यांनी सांगितले.

या वेळी माजी अध्यक्ष गणपत सीतापराव, सरचिटणीस सुजित बारसकर, पाली विभाग अध्यक्ष जीवन साजेकर, राबगाव विभाग अध्यक्ष अविनाश पवार, रासळ विभाग अध्यक्ष दामोदर ठाकूर, संचालक अरविंद दंत, नांदगाव विभाग अध्यक्ष सुधीर सावंत, संचालक केतन म्हस्के, शुभदा पाटील तसेच किशोर खरीवले, अमित निंबाळकर, हभप महेशमहाराज पोंगडे, अमर लहाने, अमोल मोरे, शरद गोळे, सुनील साजेकर यांच्यासह अन्य मराठा बांधव उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात या सर्वांचे भीम अनुयायी व पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.

# हिरवळ महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स महाडच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती रविवारी (दि.१४) उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांच्या हस्ते महामानव डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान विभाग प्रमुख प्रा.माधुरी कांबळे यांनी केले. त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवन आणि योगदानाबद्दल उपस्थितांना संबोधित केले. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य कदम यांनी डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक न्याय, समानता आणि शिक्षणाप्रती असलेल्या अतुलनीय बांधिलकीवर मार्गदर्शन केले. सर्वसमावेशक आणि न्याय्य समाजाच्या निर्मितीसाठी डॉ. आंबेडकरांचे विचार आजही किती सुसंगत आहेत हे त्यांनी विविध उदाहरणांनी समजावून सांगितले.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी डॉ. आंबेडकर जयंती साजरी केल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि युवा एकात्मता आणि पुरोगामी तत्त्वांना चालना देण्यासाठी या दिवसाचे महत्त्व पटवून दिले. डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी सामाजिक कर्तव्य पार पाडावे, असे आवाहनही त्यांनी केले.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या संचालक सोनाली धारिया यांनी अशा महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी महाविद्यालयाने पुढाकार घेतल्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वांचे पालन करण्यासाठी महाविद्यालयाच्या वचनबद्धतेबद्दल कौतुक केले. महाविद्यालयाच्या आयक्यूएसी प्रमुख प्रा. ज्योती पुजारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.






## डॉ. आंबेडकरांचे मूल्यसंस्कार आचरणे हीच खरी त्यांना आदरांजली -दिलीप भोईर

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूल्यसंस्कार आचरणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल, अशी भावना भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी व्यक्त केली. झिराड बौद्धजन पंचायत शाखेमार्फत आदर्शनगर येथे आयोजित डॉ. आंबेडकर जयंती कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमास माजी सरपंच दर्शना भोईर, भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य महेश माने, बौद्धजन पं. शाखेचे अध्यक्ष प्रशांत गायकवाड, उपाध्यक्ष मोहन गायकवाड, सचिव प्रणित गायकवाड, उपसचिव प्रणय गायकवाड, कोषाध्यक्ष मोहिनी गायकवाड, सल्लागार किशोर कांबळे, माजी मुख्याध्यापिका संचिता गायकवाड आदी उपस्थित होते.

# प्रदूषणविरहित सोलर पॅराबोलिक कुकर

## इंधन खर्चात बचत अन् पर्यावरणाचे संवर्धन

**पाली : प्रतिनिधी**

अंगाची लाही लाही करणाऱ्या या वाढत्या उन्हाळ्यात सामान्य माणूस अक्षरशः होरपळून निघत आहे. पण हेच उन्हाचे चटके आता सामान्य माणसाला सुखद ठरतील आणि भर ऊन्हाळ्याचे अन्न फुकट शिजवून देणार आहेत. जिल्ह्यात सोलर पॅराबोलिक कुकरचा काही ठिकाणी वापर होताना दिसत आहे.



यासाठी अलिबाग तालुक्यातील चौल गावचे निसर्ग मित्र शैलेश राईलकर हे सोलर पॅराबोलिक कुकर वापरत आहेत. या सोलर पॅराबोलिक कुकरमध्ये अन्न शिजवण्यामुळे इंधन खर्च शून्य झाला आहे. शिवाय पर्यावरण संवर्धनासाठी ही प्रदूषणविरहित सोलर पॅराबोलिक कुकर उपयुक्त ठरत आहे.

शैलेश राईलकर हे पारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर कमी व्हावा अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढावा यासाठी प्रचार प्रसार करीत आहेत. राईलकर यांच्या येथील हा सोलर पॅराबोलिक कुकर पाहून अनेक जण अचंबितदेखील होत आहेत.


आता कोणताही इंधन खर्च न करता या सोलर पॅराबोलिक कुकरवर अक्षरशः फुकट रोजचा घरगुती वरणभात तयार होऊ शकतो. भाज्या, कडधान्ये, बटाटेसुद्धा फुकट शिजवले जाऊ शकतात. शैलेश राईलकर यांचा हा नाविन्यपूर्ण प्रयोग यशस्वी ठरत आहेत. अनेकजण याचा लाभ घेत आहेत.

निसर्गातून फुकट मिळणाऱ्या सौरऊर्जेचा वापर करून यावर अन्न शिजते. पावसाळ्यातील दोन-तीन महिने सोडले तर इतर सर्व महिने चांगला सूर्यप्रकाश मिळतो. त्यामुळे या सोलर पॅराबोलिक कुकरचा वापर नियमित होऊ शकतो.

> **रायगड जिल्ह्यात अंगणामध्ये या सोलर पॅराबोलिक कुकरचा वापर होऊ शकतो. याशिवाय इमारतीच्या गच्चीवरदेखील वापर करता येईल. पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी अशा प्रकारची साधने आवश्यक आहेत. यामुळे पारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर बंद होऊन अपारंपारिक शाश्वत, प्रदूषण विरहित व एकदाच खर्च होणाऱ्या ऊर्जा साधनांचा अधिक वापर होईल.**
> **-शैलेश राईलकर, पर्यावरण अभ्यासक, चौल-अलिबाग**

### असे आहे उपकरण

पावसाळी छत्रीचा आकार असलेली परंतु उलट्या बाजूने ॲल्युमिनियम धातूच्या पातळ पत्र्याच्या पट्ट्यांपासून हा सोलर पॅराबोलिक कुकर बनविलेली आहे. सध्या याची किंमत साधारणपणे २० ते २२ हजार रुपये आहे, मात्र हे पैसे लागलीच वसूल होतात. अन्न शिजवण्यासाठी कोणत्याही प्रकारचे इंधन न लागल्यामुळे ऊर्जा साधनांवरील खर्च शून्य होतो. घरगुती वापराबरोबरच छोटे व्यावसायिकदेखील नक्कीच फायदा कमाऊ शकतील.



### असा करा उपयोग

सोलर पॅराबोलिक कुकर दुपारच्या भर उन्हात ठेवून यामध्ये घरातील प्रेशर कुकर रोजच्या प्रमाणे तयार करून ठेवला असता सुमारे तीन तासांत अन्न शिजते. आंघोळीसाठी पाणीही गरम करता येते. भाज्या, कडधान्ये, बटाटे या गोष्टी उत्तम शिजतात. सध्याच्या उन्हाळ्यात थंडगार कैरी पन्हे बनविण्यासाठी कैऱ्या पाण्यात ठेवून त्या उकडून घ्याव्या लागतात. या कैऱ्याही सोलर पॅराबोलिक कुकरमध्ये उकडता येतात.

# उष्णतेच्या लाटेमुळे रेल्वेस्थानकांवर पाण्याची व्यवस्था

**रोहे : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वे नेटवर्कवरील सर्व स्थानकांवर प्रवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी रेल्वे मंत्रालय वचनबद्ध आहे. उन्हाळी हंगाम आणि उष्णतेच्या लाटेच्या अपेक्षेने मंत्रालयाने स्थानकांवर पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेचा आढावा घेतला आहे आणि पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी विभागीय रेल्वेना सूचना जारी केल्या आहेत.



मंत्रालयाच्या चालू असलेल्या वचनबद्धतेनुसार सर्व स्थानके प्रस्थापित नियमांनुसार प्रवाशांना पिण्याचे शुद्ध पाणी देण्याचा प्रयत्न करतात. उन्हाळ्याच्या संभाव्य महिन्यांमध्ये या प्रयत्नांना अधिक बळकटी देण्यासाठी विभागीय रेल्वेला उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रेल्वेस्थानकांवर पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी रेल्वे मंत्रालय प्रयत्न करीत असून मध्य रेल्वे ४३४ स्थानकांवर ८०९३ पाण्याचे नळ, ४९८ वॉटर कूलर आणि १४९ नलिका विहिरींची तरतूद केली आहे.

उन्हाळ्याच्या महिन्यांमध्ये या प्रयत्नांना अधिक बळकटी देण्यासाठी विभागीय रेल्वेला उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने उपलब्धता आणि कार्यक्षमता: सर्व विद्यमान वॉटर कुलर कार्यरत असल्याची खात्री करा आणि प्रवाशांची मागणी पूर्ण करा. सध्याच्या पुरवठ्यासाठी महत्त्वाच्या स्थानकांवर पाण्याचे टँकर तैनात करा. सर्व प्लॅटफॉर्मवर पाण्याच्या उपलब्धतेची पुष्टी करण्यासाठी स्थानकांवर नियमित तपासणी करा. महिला समित्या (महिला स्वयं-मदत गट), एनजीओ, स्काउट्स आणि गाईड्स आणि इतर बचत गटांकडून, विशेषतः सामान्य वर्गाच्या प्रशिक्षकांजवळ, थंड पिण्याच्या पाण्याच्या वितरणासाठी सक्रियपणे समर्थन घ्या. पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या भागात, रेल्वे अधिकारी महापालिका, राज्य सरकारांशी सहयोग करतील आणि पर्यायी पाणीपुरवठा उपाय शोधतील.

सातत्यपूर्ण पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि कोणत्याही उद्भवणाऱ्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांकडून २४ तास देखरेखीसाठी एक प्रणाली लागू करा, असे विभागीय रेल्वेला उपाययोजना करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

मध्य रेल्वेने आपल्या प्रवाशांना पिण्यायोग्य पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पुरेशी पावले उचलली आहेत, ज्यात स्थानकांवर पाण्याचे नळ, वॉटर कुलर, कूपनलिका इत्यादींची तरतूद समाविष्ट आहे.

मध्य रेल्वेवरील ४३४ स्थानकांवर एकूण ८०९३ पाण्याचे नळ, ४९८ वॉटर कुलर आणि १४९ कूपनलिका देण्यात आल्या आहेत. मुंबई विभागाने १२०० पाण्याचे नळ, २४५ वॉटर कुलर आणि १० कूपनलिका उपलब्ध करून दिल्या आहेत. पुणे विभागामध्ये १०७४ पाण्याचे नळ, ४७ वॉटर कुलर आणि १५ कूपनलिका उपलब्ध आहेत. नागपूर विभागात २३६० पाण्याचे नळ, ६१ वॉटर कुलर आणि १८ कूपनलिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भुसावळ विभागाने २५१९ पाण्याचे नळ, १०७ वॉटर कुलर आणि ५६ कूपनलिका उपलब्ध करून दिल्या आहेत. सोलापूर विभागात ९४० पाण्याचे नळ, ३८ वॉटर कुलर आणि ५० कूपनलिका उपलब्ध आहेत.

# चेन्नईची मुंबईवर मात

## पथिरानाची चमक; रोहितची शतकी खेळी व्यर्थ



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या सामन्यात घरच्या मैदानावर मुंबई इंडियन्सचा चेन्नई सुपर किंग्ज संघाने २० धावांनी पराभव केला. चेन्नईने दिलेल्या २०७ धावांचा लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईचा संघ ६ बाद १८६ धावाच करू शकला. मुंबईच्या पराभवामुळे रोहित शर्माचे झंझावती शतक व्यर्थ गेले. पाथिरानाने शानदार गोलंदाजी करीत चार षटकांत चार विकेट्स घेतल्या.

रोहित शर्माने शेवटच्या चेंडूपर्यंत फटकेबाजी करण्याचा प्रयत्न केला, पण चेन्नईचा संघ आणि पाथिरानाची गोलंदाजी मुंबईवर भारी पडली. धोनीच्या अखेरच्या षटकातील तीन षटकारांच्या जोरावर संघाने २०७ धावांचा आकडा गाठला होता. हार्दिक पांड्याच्या शेवटच्या षटकात एकूण २६ धावा झाल्या. यात धोनीने सलग तीन षटकार मारले आणि शेवटच्या चेंडूवर दोन धावा केल्या. धोनीमुळेच चेन्नईला २०० धावांचा टप्पा पार करण्यात यश आले. हे शेवटचे षटक मुंबईसाठी भारी पडले.

प्रत्युत्तरात इशान किशनने रोहितसोबत फलंदाजी करताना चांगली सुरुवात केली, पण इशान २३ धावा करून पाथिरानाकडून बाद झाला. त्याच षटकात सूर्याही खाते न उघडता बाद झाला. रोहित आणि तिलकने ५०अधिक धावांची भागीदारी करीत संघाचा डाव सावरला, पण तिलक ३१ धावा करून झेलबाद झाला. पाथिरानाने मुंबईच्या तीन मोठ्या फलंदाजांना बाद केल्याने संघ बॅकफूटवर केला. संघाचा कर्णधार हार्दिक पांड्याने अवघ्या दोनच धावा केल्या.

डेव्हिडने सलग दोन षटकार लगावत सर्वांच्या आशा पल्लवित केल्या, पण तो पाच चेंडूंत १३ धावा करून बाद झाला, तर शेफर्ड अवघी धाव करून परतला. सगळे फलंदाज बाद होत असतानाच रोहित शर्मा एका टोकाला पाय रोवून घट्ट उभा होता, पण इतर फलंदाजांची साथ न मिळाल्याने रोहितने शतक झळकावूनही संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. त्याने ११ चौकार व पाच षटकारांच्या मदतीने नाबाद १०५ धावांची खेळी केली. चेन्नईकडून सामनावीर ठरलेल्या पाथिरानाने चार षटकांत २८ धावा देत चार विकेट्स घेतल्या, तर तुषार देशपांडे आणि शार्दुल ठाकूर यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून चेन्नईने प्रथम फलंदाजी करताना २०७ धावा केल्या. चेन्नईने अजिंक्य रहाणे आणि रचिन रवींद्र या जोडीला सलामीसाठी धाडले, पण रहाणे एका चौकारासहित पाच धावा करून बाद झाला. त्यानंतर रवींद्र १६ चेंडूंत २१ धावा करून बाद झाला. ऋतुराजच्या ६९ धावा आणि सातत्याने फॉर्ममध्ये असलेल्या शिवम दुबेच्या ६६ धावांच्या शानदार फटकेबाजीच्या जोरावर संघाने १५० अधिक धावा केल्या. मिचेलने १४ चेंडूंत १७ धावा केल्या.

सुरुवातीला मुंबईने धावांवर अंकुश ठेवला, पण शेवटपर्यंत तो कायम राखण्यात अपयशी ठरले. धोनीने चार चेंडूंत २० धावा करीत संघाच्या विजयाचा पाया भक्कम केला. मुंबईकडून हार्दिक पांड्याने तीन षटकांत दोन विकेट्स घेत ४३ धावा दिल्या, तर गेराल्ड कोएत्झी आणि श्रेयस गोपाल यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.



# धनगर समाजाच्या कबड्डी स्पर्धेत टिटवी अ आणि रोडे संघ प्रथम

**नागोठणे : बातमीदार**

कल्याणकारी धनगर समाज रोहा, तळा, मुरूड यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हातील तरुण-तरुणींसाठी आयोजित केलेली भव्य कबड्डी स्पर्धा नुकतीच रोहा येथील कुंडलिका नदीच्या तीरावरील दर्गा मैदानावर उत्साहात झाली. या स्पर्धेत पुरुष गटात टिटवी अ संघाने, तर ब गटात पेण रोडे येथील अहिल्यादेवी संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत जिल्हाभरातून पुरुष गटात ३२, तर १२ महिला संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन आमदार अनिकेत तटकरे, शिवसेना रोहा तालुका अध्यक्ष मनोज कुमार शिंदे, कल्याणकारी धनगर समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत शिंगाडे यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी धनगर समाजाचे पदाधिकारी व हजारोंच्या संख्येने बंधू-भगिनींनी उपस्थिती दर्शविली.

स्पर्धेत पुरुष गटात गारमाळ संघाने द्वितीय, म्हसाडी संघाने तृतीय आणि पाली (कर्जत) संघाने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. महिला गटात कागदे-गोयंडावाडी संघाने द्वितीय, टिटवी संघाने तृतीय व बेलवाडी संघाने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. विजेत्या संघाना रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष चंद्रकांत शिंगाडे, उपाध्यक्ष मनोहर वरक, सेक्रेटरी प्रकाश लांबोरे, खजिनदार बाळाराम होगाडे, योगेश कोकरे तसेच कमिटीतील सर्व पदाधिकारी आणि युवा नेते मनोहर गोरे, जनार्दन ढेबे, चंद्रकांत बावदाने यांनी मोलाचे सहकार्य केले.

# आयपीएलमध्ये धोनीचा नवा विक्रम

## प्रथम तीन चेंडूंवर तीन षटकार मारणारा पहिला भारतीय



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा खेळाडू महेंद्रसिंह धोनीने आपल्या फलंदाजीने प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले. धोनीने मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्याची शेवटच्या षटकात ज्या प्रकारे धुलाई केली, त्याचा आनंद सीएसकेच्या चाहत्यांनी वानखेडे स्टेडियमवर घेतला. या सामन्यात धोनीला फलंदाजी करताना फक्त चार चेंडू खेळायला मिळाले, ज्यावर त्याने सलग तीन षटकारांसह २० धावा केल्या.


चेन्नई सुपर किंग्जच्या डावातील शेवटच्या षटकात डॅरिल मिशेलची विकेट पडताच धोनी फलंदाजीसाठी मैदानात आला. धोनीने येताच पहिल्याच चेंडूपासून आपली जादू दाखवायला सुरुवात केली. त्याने हार्दिकला लागोपाठ तीन षटकार ठोकले. यासह आयपीएलमध्ये धोनीच्या नावावर एक खास विक्रम नोंदवला गेला. आयपीएलमध्ये पहिल्या तीन चेंडूंवर सलग तीन षटकार मारणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे.

आतापर्यंत कोणत्याच भारतीय खेळाडूला जमले नाही ते धोनीने करून दाखवले. धोनीने वयाच्या ४२व्या वर्षी ही कामगिरी केली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसारखे स्टार फलंदाजही आयपीएलमध्ये आजपर्यंत अशी कामगिरी करू शकलेले नाहीत.

याचबरोबर धोनीने आयपीएलमध्ये सीएसकेसाठी पाच हजार धावा पूर्ण केल्या आहेत. तो चेन्नई सुपर किंग्जसाठी अशी कामगिरी करणारा दुसरा खेळाडू ठरला आहे. याआधी सुरेश रैनाने सीएसकेसाठी हा पराक्रम केला आहे. याशिवाय धोनी टी-२० फॉरमॅटमध्ये संघासाठी २५० किंवा त्याहून अधिक सामने खेळणारा दुसरा खेळाडू ठरला आहे. त्याच्या आधी विराट कोहली या यादीत अव्वल स्थानावर आहे, ज्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून २५८ टी-२० सामने खेळले आहेत.

# रोहित शर्माने रचला इतिहास!

## टी-२०मध्ये लगावले ५००हून अधिक षटकार



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडियन्स संघावर २० धावांनी मात केली. या सामन्यात रोहित शर्माच्या नावावर एक विशेष विक्रम नोंदवला गेला. रोहितचे टी-२० क्रिकेटमध्ये आता ५०० षटकार पूर्ण झाले आहेत.

या सामन्यात मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माची जबरदस्त फलंदाजी पहायला मिळाली. सामन्यात रोहितने तिसरा षटकार ठोकताच टी-२० क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला. रोहित आता टी-२० क्रिकेटमध्ये ५००हून अधिक षटकार मारणारा पहिला भारतीय फलंदाज बनला आहे. या सामन्यापूर्वी रोहितच्या नावावर टी-२० क्रिकेटमध्ये ४९७ षटकार होते. या सामन्यात रोहितने पाच षटकार ठोकले.

रोहित शर्मा आता टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणारा पहिला भारतीय फलंदाज बनला आहे. या यादीत विराट कोहलीचे नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे. कोहलीने टी-२० क्रिकेटमध्ये आतापर्यंत ३८३ षटकार मारले आहेत. याशिवाय भारताचा आणि सीएसकेचा माजी कर्णधार एमएस धोनीचे नाव तिसऱ्या क्रमांकावर आहे. धोनीच्या नावावर टी-२० क्रिकेटमध्ये ३२८ षटकार आहेत. या यादीत चौथ्या क्रमांकावर भारताचा माजी क्रिकेटर आणि 'मिस्टर आयपीएल सुरेश रैनाचे नाव आहे. टी-२० क्रिकेटमध्ये रैनाच्या नावावर ३२५ षटकार होते.

दरम्यान, या सामन्यात मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माने दमदार कामगिरी करीत आयपीएल कारकिर्दीतील दुसरे शतक झळकावले. त्याने आपले शतक ६१ चेंडूंत पूर्ण केले. या सामन्यात ३६ वर्षीय फलंदाजाने ६३ चेंडूंत ११ चौकार आणि पाच षटकारांच्या नाबाद १०५ धावांची खेळी केलीम, मात्र इतरांनी साथ न दिल्याने तो आपल्या संघाला सलग तिसऱ्या विजयापर्यंत नेऊ शकला नाही.

# नेमबाज पलकने मिळवला पॅरिस ऑलिम्पिकचा कोटा

## पात्रता स्पर्धेत कांस्यपदक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई विजेती पलक गुलिया हिने रिओ दी जानिरो येथे रविवारी आयएसएसएफ फायनल ऑलिम्पिक क्वालिफिकेशन चॅम्पियनशीपमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल स्पर्धेत कांस्यपद जिंकले. यासह तिने देशासाठी नेमबाजीतील २०वा ऑलिम्पिक कोटा मिळवला आहे.

हरयाणातील झज्जरच्या १८ वर्षीय नेमबाज पलकने हांगझोउ आशियाई स्पर्धेत १० मीटर एअर पिस्टलमध्ये वैयक्तिक सुवर्ण आणि सांघिक रौप्यपदक जिंकले होते. आयएसएसएफ फायनल ऑलिम्पिक क्वालिफिकेशन चॅम्पियनशीपमध्ये २४ शॉटच्या अंतिम फेरीत तिने संथ सुरुवातीनंतर सुधारणा करताना आघाडी घेतली. ती २२ लक्ष्यवेधानंतर २१७.६ गुणांसह कांस्यपदक निश्चित करीत सामन्यातून बाहेर पडली. या लढतीत अर्मेनियाच्या एल्मिरा करापेटियन हिने सुवर्णपदक जिंकले, तर थायलंडच्या कामोनलाक साएंचा हिनेदेखील रौप्यपदकासह ऑलिम्पिक कोटा मिळवला.

भारताने आता पिस्टल आणि रायफल स्पर्धेत कोणत्याही देशासाठी उपलब्ध कमाल १६ पॅरिस ऑलिम्पिक कोटा मिळविला आहे. भारत १९ एप्रिलला दोहा येथे आयोजित आयएसएसएफ फायनल ऑलिम्पिक क्वालिफिकेशन चॅम्पियनशीपमध्ये पुरुष आणि महिलांच्या ट्रॅप आणि स्कीट स्पर्धेत पॅरिस ऑलिम्पिकसाठी चार कोटा निश्चित करू शकतो.

# कॅन्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेत गुकेशचा विदितवर विजय



**टोरंटो : वृत्तसंस्था**

विश्रांतीच्या दिवसानंतर दमदार पुनरागमन करताना डी. गुकेशने आठव्या फेरीत भारताच्याच विदित गुजराथीवर मात करीत 'कॅन्डिडेट्स' बुद्धिबळ स्पर्धेत पुन्हा संयुक्तरीत्या आघाडी मिळवली. इयान नेपोम्नियाशीला अझरबैजानच्या निजात अबासोवला नमवण्यात अपयश आले. त्यामुळे आता गुकेश आणि नेपोम्नियाशी यांचे समान पाच गुण आहेत. खुल्या विभागातील अन्य भारतीय बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंदने अलिरेझा फिरुझाविरुद्ध बरोबरी नोंदवली.

१७ वर्षीय गुकेशला सातव्या फेरीत फिरुझाकडून पराभव पत्करावा लागला होता, मात्र आठव्या फेरीत त्याने अधिक लक्षपूर्वक खेळ करताना नाशिककर विदितला ३८ चालींमध्ये पराभूत केले. विशेष म्हणजे गुकेशने हा विजय काळ्या मोहऱ्यांनी खेळताना मिळवला. यापूर्वी गुकेश आणि विदित पहिल्या फेरीतही आमनेसामने आले होते. ती लढत बरोबरीत सुटली होती.


गेल्या दोन 'कॅन्डिडेट्स'मधील विजेत्या नेपोम्नियाशीला यंदाच्या स्पर्धेत सर्वांत खालचे मानांकन असलेल्या अबासोवने बरोबरीत रोखले. अबासोवने पहिल्या फेरीतही नेपोम्नियाशीविरुद्ध बरोबरीची नोंद केली होती. दुसरीकडे अमेरिकेच्या दोन अनुभवी ग्रँडमास्टर बुद्धिबळपटूंमध्ये झालेल्या आठव्या फेरीच्या लढतीत हिकारू नाकामुराने अग्रमानांकित फॅबियानो कारुआनावर विजय मिळवला. प्रज्ञानंदला पांढऱ्या मोहऱ्यांचा फायदा करून घेता आला नाही आणि त्याला फिरुझाविरुद्ध अर्ध्या गुणावर समाधान मानावे लागले.

आठ फेऱ्यांअंती गुकेश आणि नेपोम्नियाशी प्रत्येकी पाच गुणांसह संयुक्तरीत्या अग्रस्थानी आहेत. प्रज्ञानंद आणि नाकामुरा त्यांच्यापेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे आहेत. कारुआना चार गुणांसह पाचव्या स्थानी आहे. त्यांच्या खालोखाल विदित (३.५ गुण) सहाव्या, फिरुझा (३) सातव्या आणि अबासोव (२.५) आठव्या स्थानावर आहे.

महिला विभागात दोन भारतीय ग्रँडमास्टरमध्ये झालेल्या लढतीत अनुभवी कोनेरू हम्पीने पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना आर. वैशालीवर ६३ चालींत मात केली. हम्पीचा यंदाच्या स्पर्धेतील हा पहिला विजय ठरला. त्यामुळे चार गुणांसह ती थेट संयुक्त पाचव्या स्थानी आली आहे. वैशाली २.५ गुणांसह तळाला आहे. सात फेऱ्यांमध्ये अग्रस्थान टिकवून ठेवलेल्या टॅन झोंगीला आठव्या फेरीत चीनच्याच ले टिंगजीकडून हार पत्करावी लागली. त्यामुळे आता झोंगी, टिंगजी आणि अलेक्झांड्रा गोर्याचकिना प्रत्येकी पाच गुणांसह संयुक्तरीत्या अग्रस्थानावर आहेत.

खुल्या विभागात गुकेशने विदितविरुद्ध अप्रतिम खेळ केला. त्याने सुरुवातीलाच विदितला थोडे गोंधळात टाकले. त्यामुळे पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या विदितने पाचवी चाल रचण्यापूर्वी जवळपास २० मिनिटे घेतली. त्यानंतर विदितने पटाच्या दोन्ही बाजूंनी गुकेशवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र डावाच्या मध्यात गुकेशने वजीर व हत्तीचा खुबीने वापर करताना लढतीवर पूर्ण नियंत्रण मिळवले. यानंतर विदितने पुन्हा चांगल्या स्थितीत येण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्याकडे चाली रचण्यासाठी फारसा वेळ शिल्लक नव्हता. गुकेशने वर्चस्व मिळवताना आठव्या घरात प्रवेश केला व विदितने ३८ चालींअंती हार मान्य केली.

# आयपीएलमध्ये ऋतुराजच्या वेगवान दोन हजार धावा पूर्ण



**मुंबई : प्रतिनिधी**

वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडिन्सचा पराभव करीत आयपीएलमधील चौथा विजय नोंदवला. ऋतुराजच्या नेतृत्त्वाखालील संघाने उत्कृष्ट कामगिरी करीत मुंबईसारख्या बलाढ्य संघाचा त्यांच्या घरच्या मैदानावर पराभव केला. या सामन्यात कर्णधार ऋतुराजने ४० चेंडूंत पाच षटकार व पाच चौकारांच्या मदतीने ६९ धावांची दमदार खेळी केली. या खेळीसह ऋतुराजने आयपीएलमध्ये दोन हजार धावा पूर्ण करीत मोठा विक्रम आपल्या नावे केला.

ऋतुराज गायकवाडने मुंबई इंडियन्सविरुद्ध अर्धशतक झळकावून या विक्रमाला गवसणी घातली. डावाचा विचार करता गायकवाड आयपीएलच्या इतिहासात सर्वांत जलद दोन हजार धावा करणारा भारतीय फलंदाज ठरला आहे. या बाबतीत वेस्ट इंडिजचा ख्रिस गेल आघाडीवर आहे.

ऋतुराजने मुंबईविरुद्ध ३३ चेंडूंत अर्धशतक झळकावले. १७२च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना ४८ धावा पूर्ण करताच त्याने दोन हजार धावांचा टप्पा गाठला. आयपीएलमधील सर्व खेळाडूंच्या यादीत गायकवाड तिसऱ्या स्थानी आहे. ख्रिस गेल आणि शॉन मार्श हे अनुक्रमे पहिल्या दुसऱ्या स्थानी आहेत. गेलने ४८ डावांत ही कामगिरी केली होती, तर शॉन मार्शने ५२ डावांत ही कामगिरी केली होती.

ऋतुराजने ५७ डावांत हा पराक्रम केला आहे. त्याच्यानंतर केएल राहुलचे नाव भारतीय खेळाडूंमध्ये आहे. त्याने आयपीएलमध्ये ६० डावांत दोन हजार धावा पूर्ण केल्या होत्या.

## प्रीमियर लीग फुटबॉल स्पर्धा

# मँचेस्टर सिटीची दुबळ्या ल्युटन संघावर एकतर्फी मात



**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

मँचेस्टर सिटीने दुबळ्या ल्युटनवर ५-१ असा दमदार विजय मिळवताना इंग्लिश प्रीमियर लीग फुटबॉलच्या जेतेपदासाठीची चुरस कायम राखली आहे. सिटीचे आता ३२ सामन्यांत ७३ गुण झाले आहेत. त्यांना लिव्हरपूल आणि आर्सेनलकडून आव्हान आहे.

ल्युटनचा बचावपटू दायकी हाशिओकाकडून झालेल्या स्वयंगोलमुळे सिटीला दुसऱ्याच मिनिटाला आघाडी मिळाली. यानंतर ल्युटनने पूर्वार्धात सिटीला केवळ एका गोलवर रोखले होते, मात्र उत्तरार्धात सिटीने गोलच्या मिळालेल्या संधी सत्कारणी लावताना मोठा विजय मिळवला. त्यांच्यासाठी माटेओ कोवाचिच (६४व्या मिनिटाला), अर्लिंग हालँड (७६व्या मि.), जेरेमी डोकू (८७व्या मि.) आणि जोस्को ग्वार्डियोल यांनी गोल केले. ग्वार्डियोलने आपला गोल ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत केला. ल्युटनचा एकमेव गोल रॉस बार्कलीने ८१व्या मिनिटाला केला होता.

अन्य लढतीत न्यूकॅसलने टॉटनहॅमला पराभवाचा धक्का दिला. न्यूकॅसलने हा सामना ४-० असा मोठ्या फरकाने जिंकला. न्यूकॅसलसाठी आघाडीपटू अलेक्झांडर इसाकने (३० व ५१व्या मि.) दोन, तर अँन्थनी गॉर्डन (३२व्या मि.) आणि फॅबियन शेर (८७व्या मि.) यांनी एकेक गोल केला. मँचेस्टर युनायटेडला बोर्नमथने २-२ असे बरोबरीत रोखले.

# शतकानंतरही रोहितने सेलिब्रेशन करणे टाळले

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सोमवारी जल्लोष होता, निराशा होती अन् क्रिकेट हा खेळ जिंकल्याचा आनंदही होता. महेंद्रसिंह धोनीला पाहण्यासाठी चाहते उत्सुक होते आणि माहीने चार चेंडूंत तुफान फटकेबाजी करून चाहत्यांना खूश केले. त्यानंतर रोहित शर्माच्या शतकाने सामन्याला वरच्या दर्जावर पोहचवले, परंतु त्याने सेलिब्रेशन करणे टाळले.

चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या रोहितने ६१ चेंडूंत आपले शतक पूर्ण केले, परंतु संघाचा पराभव अटळ आहे हे माहीत असल्याने त्याने शतकाचे सेलिब्रेशन नाही केले. रोहित ६३ चेंडूंत ११ चौकार व पाच षटकारांसह १०५ धावांवर नाबाद राहिला. चेन्नईने हा सामना २० धावांनी जिंकला.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com